नाप्यं० ग्रं. क्र. १२९६८

२०७ १७३१७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार

IRBK-0112978

IRBK-0112978

# आधुनिक महर्षी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ४०७५५ वि बा. वा.
क्रमांक ३११२ नोंद दि. २२।११।६९

-: लेखक :-

मो. मा. वाळिंबे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १२७७८ नों. दि. ............
वि. बा. वा. ........ क्र. ..................

-: प्राप्तिस्थळ :-

अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक,
पुणे ३०.

★

सौ. मालिनी कुलकर्णी
२४३ खेतवाडी, पहिली गल्ली,
अलंकार सिनेमाशेजारी, मुंबई ४.

अरगडे कुलकर्णी प्रकाशन, पुणे ३०.

किंमत दोन रुपये पन्नास पैसे

IRBK-0112978

प्रकाशकीय—

किशोरांसाठी विविध मनोरंजक व उद्बोधक पुस्तके प्रकाशित करण्याचा संकल्प आहे. आजपर्यंत प्रकाशित झालेली पुस्तके किशोरांना फारच आवडली.

"आधुनिक महर्षी" हे असेच उद्बोधक आणि संस्कारक्षम पुस्तक किशोर मित्रांना खासच आवडेल. संस्कारक्षम बालमनावर मनोरंजनाद्वारे संस्कार म्हणजेच उत्तम पुस्तके. त्यासाठीच प्रत्येकाने आमची प्रकाशने संग्रही ठेवावीत.


–: प्रकाशिका :–

सौ. निर्मला नारायण अरगडे

अरगडे कुलकर्णी प्रकाशन

१६।२२४ लोकमान्यनगर,

पुणे ३०.

प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट १९६९


( सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन )


– मुद्रक –

रामचंद्र गोपाळ पाटील

ज्ञानेश्वरी प्रेस

८३८ सदाशिव पेठ, पुणे २.

# मनोगत

या पुस्तकाच्या पुढच्या काही पानातून मी चार युगंधर महर्षींची चरित्रे वर्णिली आहेत. ' वर्णिली आहेत ', असे मी हेतु-पुरस्सरच म्हणतो आहे. कारण त्यांची भाषा आणि मांडणी केवळ माझी आहे. बाकी प्रत्यक्ष चरित्रधन जे महापुरुष हे दिव्य-दाहक जीवन जगले त्यांचे आहे.

ही चरित्रे लिहिण्याच्या कामी मला सर्वश्री दा. न. शिखरे, वसंत लोखंडे, ए. के. घोरपडे इत्यादि लेखकांनी लिहिलेल्या अनुक्रमे सुधारकाचार्य आगरकर, भारतरत्न कर्वे, भाऊराव पाटील यांच्या आठवणी, कर्मवीर भाऊराव पाटील व कोल्हा-पूरचे शाहू छत्रपती या पुस्तकांचा अत्यंत बहुमोल असा उपयोग झाला. अर्थातच त्यासाठी या सर्व लेखकांचा मी सदैव ऋणी आहे.

कोणत्याही देशाच्या घडणीत तेथल्या लहान मुलांचा महत्त्वाचा भाग असतो आणि त्या लहान मुलांच्या घडणीसाठी त्यांच्यासमोर अनेक कर्तृत्ववान, बुद्धिमान, उद्यमशील व देश-भक्त अशा महापुरुषांचा आदर्श ठेवणे अगत्याचे असते. त्या दृष्टीने अरगडे कुलकर्णी प्रकाशन, पुणे, या प्रकाशनसंस्थेने आदर्श पुरुषांच्या चरित्रात्मक पुस्तकांची एक दीपमाळच उभारायचे ठरविले. मलाही त्यांनी दोन चरित्रपुस्तके लिहायला सांगून आपल्या या दीपोत्सवात सहभागी होण्याची संधी दिली. याबद्दल मी त्यांचा अंतःकरणपूर्वक आभारी आहे. या पुस्तकाच्या रूपाने

आपल्या मार्गावर सदैव प्रकाशाची पखरण करणाऱ्या चार महापुरुषांची–सुधारकाचार्य आगरकर, भारतरत्न महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील आणि कोल्हापूरचे शाहू छत्रपती यांची–चरित्रे मी आपल्यापुढे ठेवीत आहे. माझी इच्छा एवढीच आहे, की तुम्ही बालगोपालांनी ही चरित्रे वाचून त्यापासून काही गुण घ्यावे व आपल्या देशाची मान जगात उंचावेल असे काही कर्तृत्व गाजवावे !

**मोरेश्वर वाळिंबे**
आषाढ शुद्ध प्रतिपदा
शके १८९१.

# सुधारकाचार्य आगरकर

## स्वाभिमानाचे पाणी

सुमारे नव्वद–पंचाण्णव वर्षांपूर्वीची गोष्ट. अकोल्याची एक शाळा. सकाळचे अकरा वाजले होते. वर्ग सुरू होऊन थोडा वेळ झालेला. शिक्षकांनी पाठ शिकवायला प्रारंभ केला होता. आणि एवढ्यात एक मुलगा आपले पाटीदप्तर घेऊन वेगाने वर्गात शिरला.

त्या मुलाचे तोंड घामेजले होते. धावत पळत आल्यामुळे छाती धपापत होती. वाटेत ऊन लागल्यामुळे गोरापान चेहरा लालबुंद झाला होता. त्याच्या अंगात एक स्वच्छ सदरा होता; पण त्याला दोन पाच ठिकाणी ठिगळे लावलेली. खाली पंचा नेसला होता, तोही फाटकाच. डोक्यावर टोपी होती, तीमधून शेंडीचे केस बाहेर भुरभुरत होते आणि पायात काहीच नव्हते. मुलगा गरीब होता, हे तर दिसतच होते; पण त्याचबरोबर त्याच्या चेहऱ्यावर हुषारीचे आणि करारीपणाचे तेजही लखलखत होते.



त्याच्या उशीरा येण्यामुळे शिक्षकांच्या शिकवण्यात व्यत्यय आला होता. मुलांचे लक्ष विचलित झाले होते. त्यामुळे शिक्षक रागावले व त्याची निर्भत्सना करण्यासाठी म्हणाले,

' असे उशीरा येऊन तुमचा काय अभ्यास होणार? तुम्ही असेच रखडत राहणार ! '

शिक्षकांचे ते लागट उद्गार ऐकून त्या मुलाचे डोळे पाणावले. भर वर्गात झालेला आपला अपमान त्याला विलक्षण झोंबला· एखादी वीज चमकावी, तसा लखलखाट करीत त्याच्या मुखातून शब्द बाहेर पडले,

' मी रखडत राहणार नाही. तुमच्यासारखा एम. ए. झालो नाही तरच नावाचा आगरकर ! '

शिक्षकांना त्याचे हे आत्मविश्वासाचे आणि अभिमानाचे बोल ऐकून फार कौतुक वाटले, धन्यता वाटली.

त्या दिवसापासून त्या शिक्षकांची त्या विद्यार्थ्यावर विशेष मर्जी बसली. आणि का बसू नये? तो होताच तसा गुणी मुलगा.

या मुलाचे संपूर्ण नाव गोपाळ गणेश आगरकर. कऱ्हाडजवळच्या टेंभू नामक एका छोट्या गावात १८५६ साली तो जन्मला. त्याचे वडील गणेशपंत आगरकर हे एक सज्जन स्वभावाचे, मृदु अंतःकरणाचे, भावीक मनाचे, पण स्वाभिमानी बाण्याचे गृहस्थ होते. व्यवसायाने ते भिक्षुक होते. पुराणे सांगावी, कीर्तने करावी आणि लोक जे श्रद्धेने देतील त्यावर संतोषाने आपली संसारनौका चालवावी, अशी त्यांची वृत्ती होती. लोक त्यांना आपुलकीने गणुअप्पा म्हणत.

गणुअप्पांना मुले झाली सात. त्यात गोपाळ सगळ्यात लहान.

शेंडेफळ असल्यामुळे खरे तर त्याच्या वाट्याला कौतुक यायचे, त्याचे लाड व्हायचे, पण एकाला गोंजारायचे आणि दुसऱ्याला रागेजायचे, ही त्या घरची रीत नव्हती. सगळ्यांचे सारखे कौतुक आणि सगळ्यांना सारखीच शिस्त. तथापि सातही मुलात गोपाळ उजवा होता, नावाजण्यासारखा होता.

गरीबीमुळे गणुअप्पांना कोणत्याच अपत्याच्या शिक्षणाकडे लक्ष देता आले नाही. घरच्या घरी जे पाठांतर आणि जे संस्कार त्यांना करवले असतील तेवढेच ! गोपाळला आपल्या घरच्या या परिस्थितीची पुरेपूर जाणीव होती ; पण त्याची शिक्षणाची आकांक्षाही तेवढीच प्रबळ होती. यापुढे आपल्याला टेंभू गावात शिक्षण घेणे शक्य होणार नाही असे जेव्हा त्याला दिसले, तेव्हा त्याने सरळ कऱ्हाडचा रस्ता धरला.

कऱ्हाडला त्याचे आजोळ होते. त्याचा एक मामा तिथल्या इंग्रजी शाळेत शिकत होता. गोपाळने त्याच्याच शाळेत नाव घातले आणि आपल्या इंग्रजी शिक्षणाचा शुभारंभ केला. तिथल्या शाळेत त्याच्या बुद्धीचे तेज तेव्हाच फाकले. अल्पावधीतच तो आपल्या वर्गशिक्षकांचा एक आवडता विद्यार्थी बनून गेला. त्याचे निबंध इतके मुद्देसूद आणि विचारपरिपूर्ण असत, की सगळ्या शाळेत त्याचे कौतुक होई. जी गती निबंधात, तीच व्याकरणात अन् तीच गणितात. शाळेबाहेर क्रीडांगणावरही त्याचे चापल्य आणि प्राविण्य नजरेत भरत असे. पोहणे आणि हुतुतू खेळणे हे त्याचे विशेष आवडीचे खेळ.

कऱ्हाडचे हे वास्तव्य म्हणजे गोपाळच्या दृष्टीने अत्यंत आनंदाचे, उमेदीचे आणि उत्साहाचे होते. आपण खूप शिकावे आणि आपल्या भोवतालच्या लोकांनाही शिकवावे, शहाणे करावे, आपल्या धर्मातल्या आणि समाजातल्या भोळ्या खुळ्या चालीरीतींचे उच्चा-

टण करण्यासाठी कटिबद्ध व्हावे आणि स्वत:बरोबरच आपल्या समाजाचा, धर्माचा, देशाचा उत्कर्ष साधावा, यासारखे एकाहीपेक्षा एक तेजस्वी विचार याचवेळी त्याच्या चिमुकल्या डोक्यात लखलखू लागले. पण गोपाळ आपल्या स्वप्नरंजनात मग्न असतानाच कुठेतरी पाल चुकचुकली. इंग्रजी तिसरी इयत्ता उत्तीर्ण होताच पुढील शिक्षणासाठी पैसा नसल्यामुळे त्याला नाइलाजाने आपले शिक्षण थांबवावे लागले. घरी वा दारी कुठेच त्याला सहकार्य मिळत नव्हते, सहानुभूती लाभत नव्हती. आता आपले आपणच चार पैसे मिळवले पाहिजेत, त्यांचा संचय केला पाहिजे व मग पुन्हा शाळा गाठली पाहिजे, असा विचार करून गोपाळने नोकरीच्या शोधाला सुरुवात केली. सुदैवाने त्याला कऱ्हाडच्याच मुन्सफ कार्यालयात कारकुनाची नोकरी मिळाली. यावेळी त्याचे वय होते केवळ तेरा वर्षांचे.

पण नोकरी सुरू होऊन काही दिवस झाले नाही तोच गोपाळला त्या कामाचा वीट आला. पगार तुटपुंजा होता. त्यात खाणार काय आणि साठवणार काय ? शिवाय डोक्यात एकसारखे शिक्षणाचे विचार. प्राप्त परिस्थितीवर मात कशी करावी, हे काही त्या चिमुकल्या मुलाला सुचेना. पण तेवढ्यात त्याला समजले, की रत्नागिरीला त्याचे एक चुलते राहतात. तिथल्या शाळेत ते डेप्युटीच्या जागेवर होते. साहजिकच गोपाळला वाटले, जावे त्यांच्याकडे, घालावे त्यांना साकडे, धरावे त्यांचे पाय. थोडा कमीपणा स्वीकारून जर थांबलेले शिक्षण पुढे चालू होत असेल, तर काय हरकत आहे ! एवढा विचार त्याने केला आणि ठरवून टाकले जायचेच रत्नागिरीला. होय. जायचे खरे, पण कसे ? तेव्हा काही मोटारी नव्हत्या की रेल्वे नव्हत्या. सगळा कारभार पायीपायीच.

अगदीच श्रीमंत असतील ते बैलगाडीने जात. गोपाळ गरीब. तो पायीच निघाला. जणू अढळपदासाठी तपश्चर्या करायला निघालेला दृढनिश्चयी ध्रुवबाळच ! मुलाचा हा संकल्प पाहून त्याच्या आईवडिलांची अंत:करणे भरून आली, पण त्याचबरोबर छाती अभिमानाने उंचावली. 'आपला एक तरी मुलगा कीर्तीचा केतू उभारणार,' या विचाराने त्यांना विलक्षण आनंद झाला. त्यांनी प्रेमभरल्या हृदयाने त्याला आशीर्वाद दिले. कऱ्हाडचे मुन्सफ रावसाहेब नागपूरकर. त्यांनी या विद्येच्या वारकऱ्याला पाऊणशे रुपये दिले आणि सांगितले, 'जा, यशस्वी हो. शुभास्ते सन्तु पन्थान:'

थोरांचे आणि मातापितरांचे आशीर्वाद पाठीशी घेऊन आणि उरात उच्च शिक्षणाची आकांक्षा बाळगून गोपाळने रत्नागिरीचा रस्ता तुडवायला सुरुवात केली. उन्हाखाली तापत, पावसाखाली भिजत, थंडीने कुडकुडत तो निघाला होता. एवढ्या उत्साहाने, एवढ्या उमेदीने, कष्टांशी आणि अपेष्टांशी झुंजत तो चालला होता; पण त्याच्या या परिश्रमांना यशाचे फळ प्राप्त होणार होते का ? गोपाळ म्हणत होता, 'होय. मी यशस्वी होईनच होईन!' पण नियती–ती अज्ञात शक्ती गरजून म्हणाली, 'नाही, तुला यश मिळणार नाही. अजून तुझी तपश्चर्या अपुरी आहे.' नियतीचे ते कठोर उद्‌गार साऱ्या डोंगरपहाडातून दुमदुमले. आणि खरोखरच रत्नागिरीच्या चुलत्यांनी नियतीचे ते शब्द खरे करून दाखवले. त्यांनी आपल्या प्रयत्नशील पुतण्याकडे नुसते ढुंकूनही पाहिले नाही.

ही अवस्था मोठी वाईट होती. एवढ्या प्रचंड प्रयत्नानंतर आलेले अपयश पचवणे म्हणजे गोपाळच्या धैर्यशीलतेची केवळ कसोटी होती. पण कसोटीला उतरला नाही, तर तो गोपाळ आगरकर कसचा ! तो खचला नाही, नाउमेदही झाला नाही.

रत्नागिरीलाच त्याने चार घरी वार लावले आणि जेवण्याची सोय होताच अभ्यासाला आरंभ केला. फावल्या वेळात त्याने आणखी दहा-पाच जणाकडे जाऊन किरकोळ कामे करायला सुरुवात केली. पण पुढे लोक कामे करून घेत आणि पैसे द्यायला अळंटळं करू लागले. त्यामुळे पुन्हा प्रश्न उभा राहिला. शिक्षणाला लागणारा पैसा कुठून आणायचा ? काळजी वाढत होती आणि एकसारख्या दगदगीने प्रकृतीही बिघडत होती. आता अधिक काळ रत्नागिरीला थांबणे शक्यच नव्हते. मग काय, पुन्हा शिक्षणाला पूर्णविराम द्यायचा ? नाही. शिक्षण थांबवावयाचे नाही; पण रत्नागिरीलाही थांबायचे नाही. गोपाळने निर्णय घेतला. आता पुनश्च कऱ्हाड गाठायचे.

कऱ्हाडला त्याला नोकरी मिळाली, ती दवाखान्यातल्या कंपाऊंडरची. गोपाळने ही नोकरी उत्साहाने स्वीकारली. पण आरंभीचा उत्साह पुढे टिकला नाही. तिथल्या औषधांच्या वासांनी डोके भणाणून गेले आणि रोग्यांचे भेसूर चेहरे पाहून जीवनाची आसक्तीच वाटेनाशी झाली. आपण आपले ध्येय गाठू शकणार नाही, नुसते पोट भरण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टा-अपेष्टांच्या ओझ्याखाली तडफडून मरणार, असे निराश करणारे विचार एकसारखे त्याच्या मनात थैमान घालू लागले. या हताश आणि निराश करणाऱ्या अवस्थेवर एकमात्र उपाय उरला होता आणि तो म्हणजे याही नोकरीचा निरोप घेणे.

आणि गोपाळनेही शेवटी तोच उपाय अवलंबिला. अर्थात नोकरी सोडून स्वस्थ बसणे हा हेतू त्याच्या मनात नव्हताच ! नोकरी सोडताच त्याने अकोल्याच्या थोरल्या मामाकडे मुक्काम टाकला व त्यांना आपल्या शिक्षणार्थ साहाय्य करण्यास विनविले.

अकोल्याचे मामा प्रेमळ होते, दयाळू होते. त्यांनी आपल्या भाच्याला ठेवून घेतले. इ. स. १८७२ पासून गोपाळचे शिक्षण अकोल्याला चालू झाले. नंतरची तीन वर्षे त्याने अगणित संकटांना तोंड देऊन आणि ‘निंदा जनी त्रास। अपमान उपहास’ सोसून आपले विद्यार्जन चालू ठेवले. आणि या तपश्चर्येचे फळही त्याच्या पदरात चांगलेच पडले. इ. स. १८७५ साली, म्हणजे वयाच्या एकोणिसाव्या वर्षी गोपाळ मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाला.

या यशाने त्याला केवढा तरी आनंद झाला! आता त्याचा आत्मविश्वास दुणावला. आणि पुढील शिक्षणासाठी त्याने पुण्याला जाण्याची तयारी आरंभली.

## सामाजिक सेवेचा संकल्प!

पुण्यात गोपाळरावांनी डेक्कन कॉलेजात नाव नोंदविले. डेक्कन कॉलेज म्हणजे लक्ष्मीपुत्रांचे, श्रीमंतांचे. ज्यांच्या कंबरेला पैशांचा कसा सदाचा खुळखुळतो आहे, त्यांनीच या महाविद्यालयाची पायरी चढावी, असा तेव्हाचा संकेत होता, पण आगरकरांनी तो मानला नाही.

तिथला सरासरी खर्च असे २० किंवा २५ रुपये महिना. आजच्या काळात या रकमेचे आपणास काही वाटणार नाही. पण ऐंशी-नव्वद वर्षांपूर्वी परिस्थिती कठीण होती. सामान्य माणसाला असले महागडे शिक्षण परवडणे शक्य नव्हते. गोपाळरावांना तर ही समस्या विशेषच जाणवली. पण असल्या समस्या त्यांना आता परिचयाच्या झाल्या होत्या व म्हणूनच त्यांनी त्यावरचे उपायही शोधले होते.

कॉलेजचा खर्च भागविण्यासाठी त्यांनी अकोल्याच्या ‘वऱ्हाड समाचार’ नामक वृत्तपत्रात लेख लिहून देण्याचे मान्य केले व त्या

कामापोटी त्यांना वऱ्हाड समाचारकडून प्रतिमासी ५ रुपये मिळावे, असे ठरले. याच वेळी कॉलेजने त्यांना शिष्यवृत्तीही दिली. आता शिक्षणखर्च या पैशातून भागणार होता. जेवणखर्चासाठी कुठे निबंधस्पर्धा, कुठे वक्तृत्वस्पर्धा जिकून त्यांनी पैसे मिळवायचे धोरण आरंभले. अर्थात हे उपाय कायमचे नव्हते, तात्पुरते होते. अडचणींची अटक ओलांडण्यासाठी यापेक्षा निराळा मार्ग शोधणे आवश्यक होते. गोपाळरावांनाही ते कळत होते. पण प्राप्त परिस्थितीत त्यांना एवढेच साधत होते.

एकच सदरा होता. तो दिवसा अंगात घालायचा, रात्री धुऊन वाळवायचा आणि सकाळी पुन्हा अंगात चढवायचा. गोपाळरावांनी असे किती तरी दिवस चालवले होते. जे वस्त्राच्या बाबतीत, तेच अन्नाच्या विषयात. जेवण कधी मिळाले तर मिळाले, नाही मिळाले तर हवापाण्याच्या गोष्टी करीत दिवस गुजरायचे. कारण पोटाच्या भुकेपेक्षा त्यांची डोक्याची भूक जबर होती. अन्नापेक्षा ज्ञानाची आच मोठी होती.

गोपाळरावांना या हालअपेष्टांचे काही वाटत नव्हते. त्यांचे आप्त-स्वजन मात्र त्यांची ही परवड पाहून कळवळायचे. अर्थात त्यांचा कळवळा कोरडाच असायचा. ते गोपाळरावांना सल्ला द्यायचे, तो कॉलेज सोडण्याचा आणि नोकरी धरण्याचा. आगरकरांना याचा राग येई. ते ठामपणे म्हणत, ' मी पदवी घेतल्यावाचून रहाणार नाही . '

ते निर्धाराने मार्ग काटत होते. पण अडचणी-अडथळे संपत नव्हते. कॉलेजच्या प्रथम वर्षाची परीक्षा तोंडावर आली होती, पण परीक्षेची फी भरण्यास त्यांच्याजवळ पैसे नव्हते. त्यामुळे हाताशी आलेले यश दुरावणार होते. मग त्यांनी एक नाटक लिहून पैसे

उभे करायचे योजले. पण ते नाटक त्यांना पुरे करणें साधले नाही. चिंतन-मननातच वेळ जाऊ लागला, अभ्यासाला अवसर मिळेना अन् परीक्षा तर नजीक येऊन ठेपलेली !

गोपाळरावांची ही अवस्था त्यांच्या एका मित्राने परस्परच केरुनाना छत्रे यांच्या कानावर घातली. केरुनाना तिथले गणिताचे प्राध्यापक होते. गोपाळरावांची अडचण ऐकून त्यांचे हृदय द्रवले. त्यांनी तत्काळ गोपाळरावांची परिक्षा-फी भरून टाकली व पाठीवर हात ठेवून धीरही दिला.

केरुनाना छत्र्यांच्या या अनपेक्षित औदार्याने गोपाळरावांना एक नवे कृपाछत्र लाभले. मग त्यांनी नव्या उमेदीने अभ्यासाला आरंभ केला व हातातून सुटू पाहणारे यश हातोहात जिंकून घेतले.

अपार कष्ट, स्नेहयांच्या सद्भावना व गुरुजनांचे सक्रीय प्रोत्साहन यांच्या बळावर यापुढची वाटचाल गोपाळरावांना बरीच सुगम झाली. याचा अर्थ अडचणी सरल्या असा नव्हे, पण त्या सुसह्य व्हाव्या असेही योग आले. त्यामुळे गोपाळरावांना अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रित करता आले.

इ. स. १८७८ सालच्या नोव्हेंबरात गोपाळराव बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाले. त्याच वर्षी त्यांना कॉलेजात उपप्राध्यापकाची जागा देण्यात आली. आता त्यांना प्रतिमासी पंचाहत्तर रुपये वेतन मिळू लागले. एका अर्थी ते आता सुखसमृद्धीच्या सागरात डुंबत होते. एवढ्या प्रदीर्घ वनवासानंतर मिळालेल्या यशामुळे कोणीही कृतार्थ होऊन ऐषआराम घेत स्वस्थ बसले असते. पण ऐषआराम, चैन, स्वास्थ्य या गोष्टी गोपाळरावांच्या कोशातच नव्हत्या.

बी ए नंतर त्यांनी एम्. ए. चा अभ्यास सुरू केला. पहिल्या खेपेला ते अयशस्वी झाले; पण नव्या उभारीने त्यांनी पुन्हा अभ्यास करून १८८०च्या नोव्हेंबरात एम्. ए. ची पदवी हस्तगत केली. गोपाळरावांचे हे यश म्हणजे त्यांच्या प्रदीर्घ आणि प्रचंड प्रवासाचे अंतिम ठिकाण होते. इंग्रजी शाळेत त्यांनी आपल्या गुरुजीपुढे केलेल्या प्रतिज्ञेची पूर्तता होती.

त्या काळी एखाद्याने एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण होणे, म्हणजे मोठा मान समजला जाई. अशा पदवीधरांना सरकारी नोकऱ्या घरी चालून येत. आणि तसेच चालून येत मुलींचे बाप. पण गोपाळ-राव आगरकरांना या दोन्हीचेही कौतुक नव्हते. सरकारी नोकरी करायची नाही, हा त्यांचा बाणा होता आणि बी. ए. चा अभ्यास चालू असतांनाच म्हणजे १८७७ साली त्यांचे लग्नही होऊन गेले होते. त्यामुळें त्यांना नव्हती अपेक्षा सरकारी नोकरीची, की नव्हती आशा चालून येणाऱ्या मुलीची.

गोपाळराव एम्. ए. झाले त्याचा आनंद त्यांच्यापेक्षा त्यांच्या आईला झाला, पत्नीला झाला. आईने त्यांची वणवण पाहिली होती. पत्नीनेही त्यांचे कष्ट पाहिले होते. साहजिकच त्या दोघींना वाटले, आता गोपाळराव सुखी होतील. वैभवाचे दिवस पाहतील. पण गोपाळरावांच्या स्वप्नांची त्यांना कल्पना नव्हती. आईला तर त्यांनी स्वच्छच कळवून टाकले—

" आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आता त्याला मोठ्या पगाराची चाकरी मिळेल आणि आपले पांग फिटतील, असे मनोरथ, आई, तू करीत असशील, पण मी आत्ताच सांगून टाकतो, की विशेष संपत्तीची हाव न धरता मी फक्त पोटापुरत्या पैशांवर संतोष मानून, सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार. "

## बाळ गोपाळ

डेक्कन कॉलेजात गोपाळरावांना काय काय मिळाले ? केरुनानां-सारखे सहृदय प्राध्यापक मिळाले, एम्. ए. ची पदवी मिळाली आणि मिळाला एक मित्र जिवाभावाचा, त्यांच्याच ध्येयाचा. त्याचे नाव बाळ गंगाधर टिळक. आगरकरांप्रमाणेच त्याने लोकसेवेचा, समाजोद्धाराचा आणि देशभक्तीचा ध्यास घेतला होता.

एखाद्याच्या शरीरात नानाविध रोगांनी आसरा घ्यावा, तशी तेव्हाच्या भारताची स्थिती होती. लोकांना शिक्षण नव्हते, आरोग्य नव्हते, ऐश्वर्य नव्हते आणि स्वातंत्र्य तर मुळीच नव्हते. सर्वत्र अपमान, उपहास, अन्याय. एवढा कोटयावधी लोकांचा देश. पण आत्मविश्वासशून्य, आत्मविस्मृत होऊन लोळागोळा झालेला

आगरकरांना, टिळकांना आणि त्यांच्यासारखेच आणखी जे कोणी थोडेफार लोक होते, त्यांना याची खंत वाटे. काय केले म्हणजे हा देश पुनश्च वैभवाप्रत जाईल, याचा ते अष्टौप्रहर विचार करीत

आगरकरांना वाटे, आपले देशबांधव अडाणी आहेत, दुधखुळे आहेत, आत्मविश्वासशून्य आहेत हे खरेच ! पण त्याचे कारण, दुसऱ्या कोणी त्यांना तसे बनवले नाही. त्यांची त्यांनीच ही दुर्दशा प्राप्त करून घेतली आहे. या लोकांना शिक्षणाचे अमृत पाजले, की त्यांना आपले दोष कळू लागतील व मग त्यांचे तेच सुधारतील. पण या लोकांना शिक्षण दिले पाहिजे, शहाणे केले पाहिजे. कोण देईल यांना शिक्षण ? परके इंग्रज सरकार ? पण सरकार देईल ते शिक्षण देशभक्तीचे कसे असेल ? मग स्वदेशोद्धाराचे शिक्षण कोण देणार ? कोण म्हणजे ? मी ! माझे सहकारी ! होय !

आम्ही हे व्रत घेऊ! लोकांना शहाणे बनवू, त्यासाठी शाळा काढू, वर्तमानपत्रे चालवू, सभा घेऊ, पण लोकात जागृती केल्याशिवाय स्वस्थ रहाणार नाही.

टिळकांचे विचार यापेक्षा वेगळे होते. आपल्या साऱ्या दुर्दशेचे मूळ हे पारतंत्र्य आहे, इंग्रजांची गुलामगिरीच त्याला कारण आहे. असे त्यांना वाटे. हे चाळीस कोटी लोक एकमताने, एकविचाराने भारून उठले, तर आपण इंग्रजांना घालवून देऊ व आपल्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळवू, असे ते म्हणत. पण त्यांनाही लोकजागृती-साठी शिक्षण, वृत्तपत्र, सभा ही आयुधेच महत्वाची वाटली.

मग आगरकर आणि टिळक एकत्र बसून याविषयी विचार करू लागले. 'निबंधमाला' कार चिपळूणकर हे त्यांचे मार्गदर्शक गुरु झाले. ते बी. ए. झालेले होते. टिळक, आगरकरांपेक्षा वयाने वडील होते. त्यांनीही आपल्या देशाच्या दुर्दशेविषयी खूप चिंतन केले होते व मग देशात स्वाभिमान जागविण्यासाठी लेखणीची तलवार करून ते उभे राहिले. आपल्या निबंधमालेत त्यांनी अनेक विषयांवर लेख लिहून महाराष्ट्रात अभूतपूर्व लोकजागृती केली. त्यांच्या या पराक्रमामुळे लोक त्यांना 'मराठी भाषेचे शिवाजी' म्हणू लागले.

## नव्या युगाची नौबत

दि. १ जानेवारी १८८० या दिवशी पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल' या नावाच्या नव्या इंग्रजी शाळेची स्थापना झाली. या शाळेचे संस्थापक होते विष्णुशास्त्री चिपळूणकर, बाळ गंगाधर टिळक आणि गोपाळराव आगरकर. 'तीन तिघाडे आणि काम बिघाडे' अशी आपली म्हण आहे; पण न्यू इंग्लिश स्कूलच्या विषयात ती खोटी

ठरली. चिपळूणकर, टिळक आणि आगरकर म्हणजे नव्या युगाचे ब्रह्मा-विष्णू-महेशच ठरले. त्यांच्या रूपाने सत्य, शिव आणि सुंदर यांचे एक नवे युग अवतरले.

प्रकृती फारशी बरी नसतांना, शारीरिक आणि आर्थिक अशा दुहेरी आधी-व्याधी मागे लागल्या असतांना केवळ देशोद्धाराच्या अदम्य उर्मीच्या बळावर आगरकरांनी चिपळूणकर–टिळकांच्या खांद्याला खांदा लावून या नव्या शाळेच्या कामात भाग घ्यायला सुरुवात केली.

आगरकर त्या शाळेत इतिहास शिकवीत. पण त्यांचा इतिहास वंशावळचा आणि सनावळचा यांच्या गुंतावळयात अडकून पडणारा नव्हता. एखादे ललित मधुर काव्य वा नाटक शिकवावे, अशा लालित्यपूर्ण रीतीने ते इतिहास शिकवीत. त्यामुळे विद्यार्थी रंगून जात व स्वातंत्र्याभिमानाने आणि पूर्वजांच्या पराक्रमामुळे रसरसून उठत.

टिळक आगरकरांप्रमाणेच अनेक ध्येयवादी पदवीधर या शाळेला येऊन मिळाले होते. त्या सर्वांचेच शिकवणे अत्यंत आस्थेचे आणि आत्मीयतेचे असे, तसेच राष्ट्रीय अस्मितेची जागृती करणारे असे. त्यामुळे हां हां म्हणता त्या शाळेकडे विद्यार्थ्यांचे लोंढे वाहू लागले व त्यांनी परीक्षांचे किल्ले काबीज करायला सुरुवात केली. सबंध हिंदुस्थानात अशा ध्येयवादी पद्धतीची एकही शाळा मी पाहिली नाही ' असे खुद्द गव्हर्नरांनीच उद्‌गार काढल्यामुळे शाळेच्या कीर्तीची ध्वजा आणखीच उंचावली.

शाळेचे हे देदीप्यमान यश पाहून तिच्या चालकांना म्हणजे टिळक–आगरकर आणि त्यांचे अन्य सहकारी यांना आणखी स्फुरण

चढले व त्यांनी १८८५ साली पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना केली. त्याच वर्षी आगरकर न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक झाले. फर्ग्युसनचे पहिले प्राचार्य वामनराव आपटे होते. परंतु ते १८९२ साली वारले व मग त्या जागी आगरकरांची नेमणूक झाली. मुंबई विश्वविद्यालयाच्या उपप्राध्यापकपदाची जबाबदारीही त्यांच्यावर त्याच वर्षी येऊन पडली.

एका पाठोपाठ मिळणाऱ्या या सन्मानाच्या जागा म्हणजे आगरकरांच्या निरलस कर्तृत्वशक्तीची यथायोग्य पारितोषके होती. या पारितोषकांमुळे एखाद्या माणसाला अहंकाराची बाधा झाली असती. परंतु आगरकर म्हणजे मूर्तिमंत शालीनता, सौजन्य आणि साधेपणा.

फर्ग्युसनचे प्रमुख प्राचार्य होताच त्यांनी त्या महाविद्यालयातील गरीब आणि विशेषत: मागसलेल्या जातीच्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे साहाय्य करावयास सुरुवात केली. आपल्या विद्येच्या वाटचालीत आपल्याला जे काटे, खडे खुपले, ते या विद्यार्थ्यांना खुपू नयेत, हीच त्यांची त्या मागची भावना होती. अशी मदत करण्यात त्यांना एक अनोखा आनंद, समाधान लाभत असे.

## केसरी गरजला

शाळा-महाविद्यालये ही जशी शिक्षणाची साधने, तशीच वृत्तपत्रेही शिक्षणाचीच साधने. ज्यांना शाळा-महाविद्यालयात जाता येणार नाही, अशा असंख्य लोकांसाठी वृत्तपत्रांची आवश्यकता होती व ती टिळक-आगरकरांना प्रारंभापासून माहीत होती. त्यामुळेच १८८० साली शाळा स्थापन होऊन तिने यशाची वाटचाल सुरू करताच, १८८१ सालच्या १ जानेवारीला टिळक-आगरकरांनी केसरी नावाचे वृत्तपत्र काढले. केसरीच्या प्रस्थापनेतही

टिळक-आगरकरांना चिपळूणकरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले होते. केसरी म्हणजे सिंह. लोकजागृतीसाठी आणि गुलामगिरीच्या नि:पातासाठी अक्षरश: सारे आसमंत गरजून सोडण्याचा टिळक-आगरकरांचा संकल्प होता. त्यामुळेच त्यांनी वृत्तपत्राचे नाव केसरी ठेवले. आणि पहिल्या अंकापासून आपल्या नावाप्रमाणेच केसरी गरजू लागला. टिळकांनी राजकीय विषयांवर लिहायचे आणि आगरकरांनी सामाजिक विषयांची आघाडी संभाळायची, अशी प्रारंभापासूनच त्यांनी कामाची वाटणी करून टाकली.

पारतंत्र्याशी झुंज म्हणजे इंग्रजी साम्राज्याशी झुंज. हिंदू लोकांचे मनोगत केसरीत प्रगट होई ते मराठी भाषेत. पण राज्यकर्ता इंग्रजांना ते कसे कळणार? टिळकांनी मराठा नावाचे इंग्रजी वृत्त-पत्र काढले. मराठाचे संपादक टिळक आणि केसरीचे संपादक आगरकर झाले.

शाळेप्रमाणेच केसरी–मराठाही तेव्हाच लोकप्रिय झाला; पण लोकप्रियतेबरोबरच ज्यांच्याशी लढायचे-झगडायचे त्यांची अप्रि-यताही वाटचाला येणे स्वाभाविक होती. अर्थात लोकसेवेचे कंकण बांधलेल्या टिळक आगरकरांना त्याची क्षिती नव्हती. ‘सत्याचा कैवार घेऊन शुद्ध अंत:करणाने लोकहितासाठी भांडणे’ हा त्यांचा बाणाच होता. त्या बाण्याला अनुसरून टिळक–आगरकरांनी लेखण्या उचलल्या आणि परिणामी त्या दोघांनाही प्रारंभी ‘कारागृही वास’ करण्याची पाळी आली.

प्रसंग घडला तो असा–कोल्हापूरच्या गादीवर तेव्हा शिवाजीराव नावाचे छत्रपती होते. तिथले दिवाण रा. ब. बर्वे यांनी या शिवाजी-रावांचा छळ आरंभला. त्यांच्या आईपासून, पत्नीपासून त्यांची ताटातूट केली. त्यांना वेडे ठरवून छड्यांनी व चाबकांनी फोडून

काढण्यास सुरुवात केली त्यांच्यावर गोऱ्या रखवालदारांचा पहारा चालू केला. इतकेच नाही, तर त्यांना विषप्रयोगही करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारच्या एकाहीपेक्षा एक छळांच्या वार्तांनी लोकमानस ढवळून गेले. टिळक–आगरकरांनी मग आपल्या केसरी-मराठा या वृत्तपत्रांतून बर्व्यांच्या या झोटिंगशाहीला खणखणीत जाब विचारला. त्यामुळे बर्व्यांनी या संपादक मित्रांवर अब्रूनुकसानीची फिर्याद केली

न्यायालयात टिळक–आगरकरांनी आपला बचाव करावयाचा प्रयत्न केला; पण त्यासाठी आवश्यक असणारी माहिती त्यांच्या कोल्हापूरकर मित्रांनी पुरवली नाही आणि म्हणून टिळक–आगरकरांना १८८२ च्या जुलै महिन्यात चार चार महिन्यांच्या साध्या बंदिवासाची शिक्षा देण्यात आली.

त्याच दिवशी संध्याकाळी मुंबईजवळच्या डोंगरी येथील कारागृहात टिळक आणि आगरकर बंदिस्त झाले.

त्यांची कोठडी दगडी भिंतीची होती. तेरा चौरस फुटांच्या त्या खोलीत त्या दोघांना अगदी गुदमरल्यासारखे होऊन जाई. शिवाय लघवी-शौच्याची सगळी व्यवस्था त्याच कोठडीत. त्यामुळे वातावरण आणखीच दुर्गंधीने भरून जाई. अन्न मिळायचे, ते लोखंडी कटोऱ्यातून अर्धे-कच्चे शिजलेले. पण टिळक–आगरकरांनी हे सारे भोगण्याची सिद्धता केली होतीच.

पहिले वीस–पंचवीस दिवस उलटल्यावर त्यांनी अर्ज केले आणि पुस्तके-कागद-लेखणी अशी लेखनसाधने मागवून घेतली. आगरकरांनी या कारावासाच्या काळात हॅम्लेट या इंग्रजी नाटकाचे भाषांतर केले व आपल्या तुरुंगवासाचा वृत्तांत लिहुन काढला. पहिल्या पुस्तकाचे नाव ‘ विकारविलसित ’ व दुसऱ्याचे नाव ‘ डोंगरीच्या

तुरुंगातील आमचे १०१ दिवस.' दोन्ही पुस्तके अत्यंत राचक व ललितमधुर भाषेत लिहिली आहेत.

दि. २६ आक्टो. १८८२ या दिवशी टिळक आणि आगरकर तुरुंगातून मुक्त झाले. त्यावेळी टिळकांचे २४ आणि आगरकरांचे १६ पौंड वजन घटले होते. तथापि बाहेर आल्यावर लोकांनी त्यांचा जो सत्कार केला, गौरव केला, त्यामुळे त्यांना तुरुंगवासातील अपेष्टांचे स्मरणही झाले नाही. उलट ते दुप्पट उत्साहाने कामाला लागले.

## कलहाचा कली

टिळक आणि आगरकर तुरुंगातून सुटले, लोकांनी त्यांचा सत्कार केला, ते उत्साहाने कार्याला लागले हे सगळे खरे; पण हे घडत असतानाच ते दोघेही परस्परांपासून झपाट्याने दूर होण्याची लक्षणे दिसत होती. टिळकांना राजकीय सुधारणा आणि स्वातंत्र्य या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या वाटत होत्या. एकदा इंग्रज जाऊ दे, मग आम्ही आमच्या समाजाला योग्य ते वळण लावू, असे त्यांचे मत होते. आगरकरांचे नेमके याच्या उलट मत होते. त्यांना सामाजिक सुधारणा महत्त्वाच्या वाटत होत्या. प्रसंगी परक्या सरकारने कायदे करूनही काही गोष्टी केल्या तर त्यांचा त्याला विरोध नव्हता. आधी सामाजिक सुधारणा करू, लोक शहाणे व सुशिक्षित झाले, की इंग्रज आपोआप निघून जाईल, अशी त्यांची विचारसरणी.

हा मतभेद पुढे वाढत गेला व त्याने टिळक-आगरकरांना कायमचे विभक्त केले. याचवेळी शाळेत, कॉलेजातही काही अशा गोष्टी घडल्या, की त्यामुळे परस्परात वितुष्ट यावे. शेवटी २५ आक्टोबर १८८७ साली आगरकरांनी केसरीचा संबंध सोडला व १८९० साली टिळकांनी शाळा-कॉलेजातून पाय काढता घेतला.

केसरी सोडल्यावर आपले विचार व्यक्त करण्यासाठी आगरकरांना दुसऱ्या वृत्तपत्राची आवश्यकता निर्माण झाली. त्यामुळे १८८८ सालच्या दसऱ्याला त्यांनी सुधारक नावाचे नवे वृत्तपत्र सुरू केले. ‘ इष्ट असेल ते बोलणार व शक्य असेल ते करणार ’ हे त्यांच्या ‘ सुधारका ’ चे ब्रीदवाक्य होते व त्याला अनुसरूनच त्यांनी प्रथमपासून आपले धोरण आखले. केसरीच्या प्रारंभीच त्यांना कारावासाचे कष्ट भोगायला लागले होते, सुधारकाच्या जन्मानंतर त्यांच्या बहिष्काराचे भोग आले. आपल्या परखड लेखणीचे पहिले शस्त्र त्यांना आपल्या कालपर्यंतच्या अत्यंत जिवलग मित्रावर चालवावे लागले. कारण सुधारकाचा जन्म सामाजिक सुधारणांचा अटीतटीने पुरस्कार करण्यासाठी होता, इतकेच नव्हे, तर त्या सुधारणांच्या वाटेत आडवे येणाऱ्यांना, त्यांना कर्मठ आणि बुरसटलेल्या मतांनी विरोध करणाऱ्यांना प्रखर विरोध करण्यासाठी होता. दुर्दैवाने आगरकरांचे बालचे मित्र बळवंतराव टिळक हे सनातनी पक्षाच्या बाजूने सामाजिक सुधारणांना विरोध करण्यासाठी उभे राहिले. त्यामुळे आगरकरांना अत्यंत कठीण मन करून त्यांच्यावर लेखणी चालवावी लागली. या सार्वजनिक मतभेदांना पुढे पुढे तर व्यक्तिद्वेषाचे अतिशय वाईट वळण लागले. टिळक आणि आगरकर दोघेही खंदे पत्रकार. दोघेही परस्परावर टीकेची भालाफेक करण्याची निमित्ते शोधू लागले व मिळालेली संधी साधू लागले. अशीच एक संधी आगरकरांना मिळाली. गोष्ट घडली, ती अशी —

पुण्यात पंचहौद मिशन नावाची एक ख्रिश्चन लोकांची संस्था आहे. तिथल्या काही मंडळींनी पुण्यातल्या काही विद्वानांना तिथे व्याख्यानासाठी बोलावले. मग काय ? न्या. रानडे, हरिभाऊ

आपटे, बळवंतरावजी टिळक असे मोठमोठे दिग्गज तिथे गेले. व्याख्यान म्हटले, की नंतरचे चहापान आलेच. पण तो ख्रिस्त्याचा चहा ! त्यात ८०-९० वर्षांपूर्वीचा काळ ! सामाजिक आणि धार्मिक विधिनिषेध अत्यंत काटेकोर पाळले जायचे, असे ते दिवस ! पण पुढे आलेल्या चहाचा मोह तरी कसा सुटावा ? शिवाय प्रतिष्ठेचे व सार्वजनिक जीवनाचे संकेत नको का पाळायला? शेवटी सर्वांनी चहा घेतला. चहाबरोबर बिस्किटे आली, तीही उदरात रिचवली. एरवी सुधारणांना विरोध करणाऱ्या टिळकांनीही तिथे चहापान केले आणि ही वार्ता आगरकरांना समजली. त्यांचे डोळे मिस्किल-पणाने चमकले. ते म्हणाले, ' छान ! छान ! बरे सापडले बळवंत-राव ! नेहमी सुधारणांना विरोध करून सनातनी पक्षाचा टेंभा मिरवता नाही का ? आता घेतो चांगली हजेरी ! '

आणि खरोखरीच त्यांनी टिळकांची अशी हजेरी घेतली, की टिळक अगदी गडबडून गेले. पण एकसारख्या घडत जाणाऱ्या असल्या मतभेदांच्या प्रसंगांनी त्या मित्रांच्या जीवनातले सुख-स्वास्थ्य–समाधान नष्ट होत गेले, हे मात्र खरे.

### अमुचा पेला दुःखाचा

काही असले, तरी आगरकरांच्यापेक्षा टिळकांविषयी लोकात अतिशय आदर होता. आणि टिळकांशी भांडणारा, आपल्या जुन्या, सनातनी श्रद्धांना सुरुंग लावणारा आणि सुधारणांच्या नावाखाली आपल्या देवा-धर्माची निंदा करणारा हा आगरकर आपला शत्रू आहे, असाच सर्व समाजाचा समज झाला. त्यामुळे आगरकरांना शिव्या द्याव्या, त्यांची टवाळी करावी, त्यांच्यावर हल्ले चढवावे, असे उद्योग रोजच्या रोज चालू झाले.

आणि एक दिवस तर या ' सुधारक ' विरोधक लोकांनी

कहरच केला. त्यांनी चक्क आगरकरांचा एक चिध्यांचा पुतळा बनवून, त्याची प्रेतयात्रा काढली. त्या प्रेतावर आगरकरांच्या ' सुधारक 'पत्राचे अंक पांघरले होते आणि प्रेतयात्रेबरोबरचे टवाळ लोक तालस्वरात आगरकरांना शिव्या देत चालले होते. आगरकरांनी ते दृश्य पाहिले आणि त्यांना वाईट वाटले, दु:ख झाले.

ते दु:ख कशाचे होते ? स्वत:ची प्रेतयात्रा काढल्याचे ? नाही. आगरकरांना दु:ख झाले, ते या समाजाच्या अध:पतनाचे. स्वत:ला नको असलेला, पण अत्यंत चांगला, समाजहिताचा विचार जनमानसात रुजवू पाहणाऱ्या व्यक्तीला हालअपेष्टांना तोंड द्यावे लागते, हे त्यांना माहीत होते. तरीही लोकांनी आपल्याला विरोध करताना या थरावर यावे, याचा त्यांना विशाद वाटला.

पण ही झाली त्यांच्या पुतळ्याची विटंबना. पुढे तर एका सभेत लोकांनी त्यांच्यावर शेणाचे गोळे फेकले. विटांचे तुकडे टाकले. आगरकर मात्र या सर्व प्रसंगी शांत असत. रागावत नसत. ते उलट विरोधकांना म्हणत, मला विरोध करण्यासाठी का होईना, तुम्ही रागावता, पेटून उठता, हे चांगले लक्षण आहे. आता या देशाला लौकरच उज्ज्वल दिवस येतील.

आगरकरांचे हे भविष्य तंतोतंत खरे ठरले. आपल्या देशाला खरोखरीच उज्ज्वल दिवस आले. त्यांना अपेक्षित असणाऱ्या साऱ्या सुधारणा आता झाल्या आहेत. बालविवाहाची, सतीची दुष्ट रूढी आता नष्ट झाली आहे. विधवाविवाह, पुनर्विवाह, इतकेच काय, आंतरजातीय अन् आंतरधर्मीय विवाहही आता सर्रास होत आहेत. जातीभेद आता कोणी पाळीत नाही. अस्पृश्यांना दूर ठेवणे, त्यांना सामाजिक सुखसोयी, शिक्षण, इ. नाकारणे हा गुन्हा मानला गेला आहे. स्त्रिया नुसत्या सुशिक्षितच

झाल्या असे नव्हे; तर पुरुषांच्या बरोबरीने नोकरीधंद्यात, राज्य-कारभारात, क्रीडांगणावर आणि रणांगणावरही भाग घेऊ लागल्या आहेत. हे दिवस निश्चितपणे सोन्याचे आहेत, सुखाचे आहेत, पण ज्यांच्या त्यागातून, हालअपेष्टातून हे दिवस फुलले-उमलले ते आगरकरांसारखे महात्मे आज हयात नाहीत.

आयुष्याच्या प्रारंभ काळातच त्यांना अर्धपोटी राहावे लागले, दारिद्र्य, दैन्य, दास्य यांच्याशी झुंजावे लागले. त्यांचा परिणाम त्यांचे शरीर खंगून जाण्यात, क्षीण होण्यात झाला. दम्यासारखी दुर्धर व्याधी कायमची मागे लागलेली. तशातच ज्या संस्थांतून ते वागले-वावरले तिथे होणाऱ्या मनस्तापाची भर पडली. बाहेर पाहावे तर सर्व समाज क्रुद्ध–विरुद्ध. अशा वेळी एखाद्याने आपले जीवन आपल्या हातानेच संपुष्टात आणले असते. पण आगरकर खंदे लढवय्ये होते. धीरोदात्त योद्धे होते. झुंजत झुंजतच ते देह ठेवणार होते. आणि अखेर तसेच झालेही.

अनंत आधी–व्याधींनी गांजलेला त्यांचा देह थकून गेला आणि दि. १७ जून १८९५ या दिवशी, वयाच्या अवघ्या एकूणचाळी-साव्या वर्षी त्यांची प्राणज्योत विझून गेली.

आगरकरांचा अंत झाला आणि त्यांचे सहस्रावधी शत्रु–मित्र त्यांच्या अंत्यदर्शनाला धावले. मित्रांना, विद्यार्थ्यांना तर दुःख अनावरच झाले; पण आगरकरांशी भांडणारे, वितंडवाद घालणारे त्यांचे विरोधकही त्यांच्या मृत्यूने मूक होऊन अश्रू ढाळू लागले. टिळकांनी त्यांच्यावर जो मृत्युलेख केसरीत लिहिला, तो अक्षरशः त्यांच्या आठवणी आठवीत आणि उपरण्याने डोळे टिपीत.

अखेर महायात्रेची सिद्धता झाली. आगरकरांचे निष्प्राण शरीर

उचलले गेले, तेव्हा त्यांच्या उशाशी एक पुरचुंडी मिळाली. त्यात काय होते ? त्यात काही पैसे होते व चिठ्ठी होती. तीवर लिहिले होते–'माझ्या अंत्यक्रियेसाठी !' ती चिठ्ठी आणि ती पुरचुंडी पाहून तिथे जमलेल्या लोकांना हुंदकाच फुटला.

सतत २१ वर्षे आगरकरांनी पुण्यातल्या समाजाची निरनिराळ्या नात्यांनी सेवा केली होती व त्या समाजाला आपले संजीवक विचार ऐकवले होते. अशा महात्म्याचा, पुण्यश्लोक महापुरुषाचा शेवटही त्याच पुण्यपुरीत होत होता आणि शेकडो लोक त्यांना आदरांजली वाहत होते, आजही वाहतात.

# महर्षी अण्णासाहेब कर्वे

## एक अमोलिक रत्न

रत्नागिरी जिल्हा म्हणजे साक्षात अगणित रत्नांची खाण ! डॉ. भांडारकर, लो. टिळक, भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले, रँ. परांजपे, डॉ. आंबेडकर, साने गुरुजी--एक का दोन ! किती नावे सांगावी अन् कितीकांची कीर्ती गावी ! महर्षी अण्णासाहेब कर्वे हेही त्याच रत्नमालिकेतले आणखी एक अमोलिक रत्न !

या साऱ्या महापुरुषांनी नानाविध क्षेत्रात मोठमोठी महत्त्वाची कामे करून आपली व आपल्या देशाची नावे इतिहासात अजरामर करून टाकली आहेत. अण्णासाहेबांनीही असेच एक महत्त्वाचे पण सहसा कोणी करायला धजणार नाही, असे कार्य हाती घेऊन त्यासाठी सबंध आयुष्य वेचले. आज आपल्याला कल्पना येणार नाही किंवा खरेही वाटणार नाही, पण शंभर-दीडशे वर्षांपूर्वी आपल्या या देशातील स्त्रियांची अवस्था मोठी कठीण होती. त्या

महर्षी अण्णासाहेब कर्वे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा २१
अनुक्रम ........ वि ........
क्रमांक ........ नोंद दि ........



काळी बायका शिकलेल्या नसत. त्यांची लग्ने लौकर केली जात. तशात एखादी रोगाची साथ आली, की झाडावरून टपाटप पाने खाली पडावीत, तसे त्यांचे नवरे त्या रोगामुळे मरून जात. मग त्या नवरे मेलेल्या लहान लहान मुलींना आणखीच वाईट दिवस येत. त्यांना अष्टौप्रहर अंधारात राहून कामाचे डोंगर उपसायला लागत. त्यांचे केस कापून त्यांना विद्रूप केले जाई. त्यांना पुन्हा लग्न करून संसार मांडता येत नसे, समाजात हिंडता-फिरता येत नसे, सर्व प्रकारची सुखे, आनंद त्यांना पारखे होत.

– अशा त्या दुर्दैवी मुलींचा, बायकांचा उद्धार करण्याचे, त्यांना पुन्हा माणसात आणण्याचे आणि त्यांच्या आयुष्यात आनंदाची व सौख्याची कारंजी उचंबळून सोडण्याचे महत्कार्य अण्णासाहेब कर्वे यांनी केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाजाकडून खूप त्रास सहन करावा लागला, हालअपेष्टा भोगाव्या लागल्या, प्रसंगी मार-हाणही झाली; पण त्यांनी आपले कार्य सोडले नाही. चिकाटीने, सातत्याने, यश मिळेपर्यंत ते झगडत राहिले. आपले काम करीत राहिले.

**बालपण**

रत्नागिरी जिल्ह्यात शेरवली नावाचे एक निसर्गरम्य गाव आहे. ते अण्णासाहेबांचे आजोळ–आईचे माहेर. तिथे इ. स. १८५८ सालच्या १८ एप्रिल या दिनांकाला अण्णासाहेबांचा जन्म झाला. अण्णासाहेबांच्या जन्मापूर्वी त्यांच्या आई-वडिलांची तीन अपत्ये मृत्युमुखी पडली होती. अण्णासाहेब हेच त्यांच्या घरात प्रथम जग-लेले मूल. त्यामुळे त्यांच्या आईने त्यांचे नाव धोंडू असे ठेवले.

शेरवलीपासून १५ मैलावर मुरुड नावाचे दुसरे असेच एक निसर्गसुंदर गाव आहे. ते अण्णासाहेबांचे गाव. त्यांचे वडील

केसोपंत तिथे राहात अत्यंत शांत स्वभावाचे, सौजन्यशील वृत्तीचे व हरहिकमती म्हणून त्यांचा आसपासच्या पंचक्रोशीत लौकिक होता. सतत काही ना काही उद्योगात ते गुंतलेले असायचे. फावल्या वेळात चित्रे काढावी, वाखाची दोरखंडे बनवावी, पत्रावळी लावाव्या, न पेक्षा रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप यासारख्या पोथ्या वाचून आपली व शेजाऱ्यांची करमणूक करावी, असा त्यांचा परिपाठ असे. पहाटे उठून ते भूपाळ्या म्हणत. देवपूजा करीत.

अण्णासाहेबांची आईदेखील अशीच साध्वी स्त्री होती. ती विनयी होती, तशीच मानी पण होती. सतत उद्योग करीत राहणे, हा तिचाही ध्यास होता. आपल्या तुटपुंज्या मिळकतीत काटकसर'-पणाने पण परोपकारी वृत्तीने राहावे, असा अण्णासाहेबांच्या आई-वडिलांचा वर्तनक्रम होता

अशा सुशील आणि सुस्वभावी माता-पित्यांच्या पोटी जन्म लाभल्यामुळे अण्णासाहेबावरही हेच सद्‌गुण संस्कारित झाले. आपल्या माता-पित्यांप्रमाणेच तेही लहानपणापासून शांत–विनम्र स्वभावाचे, उद्योगी व व्यासंगी वृत्तीचे आणि दयाळू व श्रद्धाळू झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण मुरुडलाच झाले. उजळणी, गणिते, वाचन, लेखन हे आणि आर्या, भूपाळ्या, आरत्या यांचे पाठांतर हे तिथले शिक्षण. अण्णासाहेबांना हे सर्व शिक्षण, तर घरच्या घरीच मिळालेले. त्यामुळे पाहता पाहता ते शाळेत पास होत गेले. त्यांचे वाचन शुद्ध व स्पष्ट असे. एका दिवसात शिवलीलामृत व एका आठवड्यात गुरुचरित्र वाचून संपविण्यात ते तेव्हाच प्रवीण झाले.

त्यांची वाणी खणखणीत व गळा गोड असे. भूपाळ्या व देवाची स्तोत्रे ते सुरावर म्हणत. देवळात जाऊन कीर्तने ऐकत व कधी कधी नाटके सुद्धा पाहात.

खेळायचा तर त्यांना लहानपणापासून विलक्षण नाद. पत्ते, गंजीफा, सोंगटया इथपासून ते सूरपारंब्या, खोखो आटयापाटया इथपर्यंत सर्व खेळ ते मोठ्या चापल्याने व लीलेने खेळत. कोकणात जागोजाग विहिरी. त्यात उड्या टाकून पोहण्याची प्रत्येकाला हौस. पण का कुणास ठाऊक अण्णासाहेबांना पाण्याची भीती वाटे पोहायला जायची वेळ आली, की ते कणगीआड, गोठ्याजवळ, माळ्यावर कुठे तरी लपून बसायचे. पण त्यांच्या मित्रांनी एकदा त्यांना पकडलेच आणि नेले विहिरीवर. अण्णासाहेब पाणी पाहून घाबरले, पळू लागले. एवढ्यात एकाने त्यांचे मुटकुळे धरून दिले टाकून विहिरीत. आतल्या दोघा–चौघांनी त्यांना पाय मारायला शिकवले अन् त्या दिवसापासून अण्णासाहेब पोहायला शिकले.

## शिक्षणाचा शुभारंभ

मुरुडचे दिवस असे खेळण्यात, हुंदडण्यात आणि प्राथमिक अभ्यासात सरले. तेवढ्यात अण्णासाहेबांच्या वडिलांनी त्यांचे लग्न करून टाकले. त्यांची पत्नी राधाबाई हिचे वय तेव्हा केवळ नऊ वर्षांचे होते. अण्णासाहेब होते पंधरा वर्षांचे. दोघेही लहानच. लग्न, संसार या गंभीर गोष्टींचा अर्थ दोघांनाही कळत नसला तरी खेळायला ‘मनासारखा सवंगडी’ मिळाला होता. पण अण्णासाहेबांना त्या कोणत्याच गोष्टीत रस नव्हता. त्यांची महत्त्वाकांक्षा होती शिकण्याची–मोठमोठ्या परीक्षा देण्याची अन् पदवीसंपन्न होण्याची.

सहावीची परीक्षा देण्यासाठी त्यांनी मुंबईला जायचे ठरवले. मुरुडपासून आंजर्ल्यापर्यंत ते गेलेही. पण अचानक पाऊस कोसळू लागला. समुद्र उसळ्या घेऊ लागला आणि मुंबईला जाणारे गलबत जागचे हललेच नाही. अण्णासाहेबांच्या महत्त्वाकांक्षेवर हे

असे पावसाचे 'पाणी पडले.' पण बोलूनचालून पावसाचेच पाणी ते! पडले तसे ओसरून गेले. मग अण्णासाहेबांनी सातारला जायचे ठरवले.

सातारची परीक्षा अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपलेली. मुरुडपासून सातारा १०८ मैल दूर. वाहने नाहीत. सगळा प्रवास पायी करायचा. पण अण्णासाहेबांची झेपच गरुडाची. ते आणि त्यांचे आणखी चार सोबती सातारला निघाले. पाठीवर बांधलेल्या गाठोड्यात धोतर, मुकटा, पुस्तके, तांब्या-भांडे, घोंगडी आणि फराळाचा डबा.

मुरुड-चिपळूण-पाटण आणि सातारा असा हा मार्ग. वाटेत खड्डे किती, डोंगर किती, नद्या किती अन् ओढे तरी किती. घाट काय, जंगले काय, खिंडी काय–सगळा वनवास! पण या विद्यार्थ्यांचा उत्साह या सर्व वनवासावर मात करून उरला. सातारला ते ज्या दिवशी पोचले, त्या दिवशीच परीक्षेचा पहिला दिवस होता. परीक्षा होती सकाळी दहा वाजता अन् अण्णासाहेब आपल्या मित्र-मंडळींसह तिथे पोचले, तेव्हा संध्याकाळचे पाच वाजायला आले होते, झाले, आता कसची परीक्षा अन् कसचे काय! त्या पाचही मित्रांची अगदी निराशा झाली. परत फिरायचे, म्हणून ते विचार करू लागले. पण एवढ्यात कुणी तरी त्यांना सांगितले, 'अरे, निराश कसचे होता? आज नुसती नाव नोंदणीच झाली. परीक्षा आहे उद्यालाच!' ते शब्द त्या विद्यार्थ्यांना अमृतवाणीसारखे वाटले आणि मग त्यांची मुखकमले एकदम हसू लागली. आनंदी दिसू लागली. ती रात्र त्यांनी दुसऱ्या दिवशीच्या परीक्षेच्या स्वप्न-रंजनात घालवली. अण्णासाहेबांना वाटले, आता आपली शिक्ष-णाची आस पुरी होणार! ही परीक्षा आटोपली की मग त्याच्या-

पुढची, ती सरली की महाविद्यालय ! पण भजन ऐन रंगात यावे अन् तंबोऱ्याची तार तुटावी, तसे झाले.

दुसऱ्या दिवशी अण्णासाहेब नावे नोंदविणाऱ्या कारकुनासमोर जाऊन उभे राहिले, तो काय? अण्णासाहेबांची ती काटकुळी आणि बुटकी मूर्ती पाहून त्या कारकुनाने अण्णासाहेबांना परीक्षेला बसायलाच नकार दिला. त्याचे म्हणणे त्यांचे वय अठरापेक्षा कमी असले पाहिजे. अण्णासाहेब आपले वय अठरा आहे असे खोटेच सांगून परीक्षेला बसू पाहत आहेत व आपल्याला फसवीत आहेत. अण्णासाहेबांनी परोपरीने सांगितले, विनवून पाहिले, 'देवाशप्पथ मी खरेच अठरा वर्षांचा आहे,–' असे म्हणून आपल्या सत्यवचनीपणाची ग्वाहीदेखील दिली ! पण छे ! रामाचे नाव ! कारकून काही ऐकेना. मग अण्णासाहेबांनी आपली बाजू परीक्षकापुढे मांडली. तिथेही अनुभव तोच ! अखेर अण्णासाहेब हिरमुसले, हताश झाले आणि परत फिरले. आपल्या गावी येऊन नव्या परीक्षेची वाट पहात राहिले.

सप्टेंबर महिन्यात पुन्हा परीक्षा होती. आता अण्णासाहेबांनी कोल्हापूरची वाट धरली. पुन्हा तसाच जीवघेणा आणि अडचणीचा प्रवास. मुरुड-चिपळूण-कऱ्हाड अन् मग कोल्हापूर. पाठीवर ओझे आणि प्रतिदिवशी पंचवीस मैलांची पायपीट. पण तिथे गेल्यावर मागच्यासारखी निराशा झाली नाही परीक्षेला बसायला मिळाले. अण्णासाहेबांना तेवढेच हवे होते. कारण परीक्षेत उत्तीर्ण होणे, हा तर त्यांच्या हातचा मळ होता. त्याप्रमाणे ती परीक्षा ते उत्तीर्ण झालेही. त्या यशाने त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. ते घरी परतले, तेव्हा रात्रीचे अकरा वाजून गेले होते. त्यांच्या बहिणीने त्यांचे अक्षरशः पंचारती ओवाळून स्वागत केले. त्या दिवशी

भाऊबीज होती. आयुष्यातली एक अविस्मरणीय आनंदाची भाऊबीज म्हणून अण्णासाहेबांना तिची नेहमी आठवण होत राहिली.

## विद्येसाठी पायपिटी

वयाच्या अठराव्या वर्षी अण्णासाहेबांनी इंग्रजी मुळाक्षरे गिरवायला सुरुवात केली. महाड येथे त्यांची ही इंग्रजी शाळा होती. त्या शाळेत अवघी पंधरा मुले शिकत व शाळा होती एका गोठ्याच्या माडीवर. भर दुपारी तिथे उन्हाने अंगाची तलखी होई अन् घामाच्या धारा निथळू लागत. खालून जनावरांच्या मुताचा वास येई. त्या दुर्गंधीने डोके उठून जाई. असल्या तापदायक शाळेत अण्णासाहेबांनी दोन वर्षे काढली. इंग्रजी शिक्षणाच्या तीन इयत्ता तिथे पार पडल्यावर मग ते रत्नागिरीला गेले.

रत्नागिरीच्या विद्यालयात त्यांच्या बुद्धिमत्तेचे पाणी चांगलेच चकाकू लागले. पहिल्या वर्षीच्या वार्षिक परीक्षेत त्यांचा क्रमांक पहिल्या पाचात आला. दरमहा दोन रुपयाची शिष्यवृत्तीही मिळू लागली. त्यातली दीड रुपया फी गेली तरी आठ आणे हाती शिल्लक उरतच. आता ही शिक्षणाची गाडी अशीच निर्वेधपणे वाट चालून जाईल असे वाटले. पण नाही! अजून अडचणींची अटक पुरती उल्लंघन झाली नव्हती. रत्नागिरीला त्यांना थोडासा ताप आला. आज हटेल, उद्या हटेल असे करता करता तो चांगलाच लांबला आणि अखेर अण्णासाहेबांना रत्नागिरी सोडून मुरुडला घरी येऊन पडावे लागले.

अर्थात तिथेही स्वस्थ बसून भागणार नव्हते. वडिलांची मिळकत थोडी होती आणि वयात आलेल्या मुलाने निव्वळ बसून राहणे हे शोभणारे नव्हते. मग तिथल्याच प्राथमिक शाळेत अण्णासाहे-

बांनी ५ रुपये मासिक वेतनावर शिक्षकाची नोकरी पत्करली. शाळा सात तास चालत असे. उरलेल्या वेळात ते इंग्रजीचा अभ्यास करीत. थोडे दिवस असे घालवल्यावर, त्यांनी मुंबईला जाऊन इंग्रजी पाचवीचा अभ्यास सुरू केला. मुरुडच्या काही विद्यार्थ्यांनी तिथे एक खोली घेतली होती, तीत राहून मुरुडच्याच एका माणसाच्या खाणावळीत ते जेवू लागले. तीन वर्षे अशा प्रकारे काढून, त्यांनी मॅट्रिकच्या परीक्षेत भरघोस यश मिळवले. या यशामुळे त्यांना खूप आनंद झाला व त्यांचे सारे श्रम कारणी लागल्यामुळे अधिक उत्तेजित होऊन ते कॉलेजमध्ये गेले.

या इंग्रजी शाळेत एकदा त्यांच्यावर एक संकट कोसळले. त्यांचे हस्ताक्षर प्रारंभापासून अत्यंत वाईट. त्यामुळे शिष्यवृत्ती मिळायला अडचण येऊ लागली. ही अडचण दूर करावी व हस्ताक्षर सुधारावे, म्हणून त्यांनी खूप परिश्रम केले. परिणामी हस्ताक्षर सुधारले, शिष्यवृत्तीही निर्वेध झाली, पण त्यातूनच एक नवे प्रकरण उद्‌भवले. सुरेख हस्ताक्षराची अण्णासाहेबांची एक वही शिक्षकांना दाखवून वर्गातल्या एका विद्यार्थ्याने छातीठोक सांगितले, 'हे हस्ताक्षर कर्व्यांचे नाही. त्याचे अक्षर अगदी रद्दी आहे. हे त्याने दुसऱ्याकडून लिहून घेतले आहे.'

शिक्षकांना खरा प्रकार काय आहे हे माहीत नव्हते. त्यांनी सरळ अण्णासाहेबांना चोपण्यासाठी वेताची छडी उगारली. आता तरी अण्णासाहेबांनी तोंड उघडून स्वतःच्या निरपराधीपणाची ग्वाही द्यावी की नाही; पण ते पडले मुलखाचे मुखदुर्बळ. ते मुकाट्याने 'आलिया भोगासी सादर' झाले. छडी खाण्यासाठी हात पुढे करून उभे राहिले. मात्र चेहरा भ्यालेला आणि तरीही निष्पाप. शिक्षकांनी छडी मारण्यापूर्वी एक क्षणभर विचार केला व आवा-

जात कोवळीक आणून ते म्हणाले. 'हे बघ कर्वे, तू पुन्हा काही मजकूर लिहून दाखव म्हणजे तुझे हस्ताक्षर कसे आहे, ते आम्हाला कळेल आणि लबाडी केली असलीच तर तेही समजून येईल.' अण्णासाहेबांना शिक्षकांचा हा सल्ला ऐकून एकदम बरे वाटले, हायसे वाटले. त्यांचा चेहरा आनंदाने फुलून आला. ते चटकन् म्हणाले. 'मी पुन्हा मजकूर लिहून दाखवतो.'– अन् मग त्यांनी पुन्हा मजकूर लिहून दाखवला. या प्रसंगाने त्यांचा भाबडेपणा जसा सर्वांना कळून आला, तसाच शांत स्वभावही समजून आला.

अण्णासाहेब शाळेत शिकत होते, हुशार असल्यामुळे त्यांना शिष्यवृत्ती मिळत होती अन् त्यातून फी–पुस्तकांचा खर्च भागत होता. तथापि जेवण्या–राहण्याचा खर्च चालविण्यासाठी आणखी पैशांची आवश्यकता असेच ! त्यासाठी अण्णासाहेब अन्य बारीक–सारीक उद्योग करीत. एक शिकवणी होती. पण मोबदला किती होता म्हणाल, तर प्रतिमासी अवघा एक रुपया ! एका गृहस्थांना दर रविवारी ते ग्रंथ वाचून दाखवीत. त्याबद्दल त्यांना दोन आणे मिळत. हे आणि आणखी असेच कितीतरी उद्योग ! या उद्योगातून मिळणारे पैसे ते अत्यंत जपून वापरीत. दर रुपयाला एक पैसा धर्मादाय याप्रमाणे वेगळी शिल्लक साठवीत. एकदा असेच तीन रुपये जमले होते. त्याच सुमाराला खाणावळवाला आजारी पडला. औषधपाणी घ्यायला त्याच्याजवळ पैसे नव्हते. अण्णासाहेबांनी साठवलेल्या तीन रुपयातून त्याला औषधपाणी केले आणि परोपकारामुळे झालेल्या आनंदाच्या भरात मजेने शीळ घालीत ते घरी परतले.

कॉलेजचे शिक्षण घेण्यासाठी ते पहिल्या वर्षी विल्सन कॉलेजात गेले. तिथे शिष्यवृत्ती आठ रुपये मिळायची. पाच रुपये मासिक

फी गेली, की तीन रुपये उरायचे. ते तीन व शिकवणीतला एक रुपया असे चार रुपये खाणावळीत द्यायचे. कपडे, पुस्तके, जागा-भाडे किंवा अन्य किरकोळ खर्च भागविण्यासाठी शिकवणीचेच पैसे उपयोगात आणायचे. पाचपासून आठ रुपयापर्यंत मासिक-प्राप्ती होणाऱ्या तीन शिकवण्या तेव्हा ते करीत. इंग्रजी शाळेत शिकत असतांना त्यांनी आपल्या मामाकडून २०० रुपये कर्ज काढले होते. ते कर्जही कॉलेजच्या काळात केलेल्या या शिकवण्या-तून त्यांनी फेडून टाकले.

कॉलेजची पहिल्या वर्षाची परीक्षा ते द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. एवढेच नव्हे तर गणित विषयासाठी जाहीर केलेले खास पारितोषिकही त्यांनी जिंकून घेतले.

दुसऱ्या वर्षाच्या परीक्षेसाठी मात्र ते एल्फिन्स्टन कॉलेजात गेले. त्याच कॉलेजातून वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी, म्हणजे इ. स. १८८४ साली अण्णासाहेब बी. ए. झाले. अण्णासाहेबांनी मिळविलेले हे देदीप्यमान यश पाहून त्यांच्या आप्त-स्वजनांना व मित्रमंडळींना मोठाच आनंद झाला. कष्टाच्या आणि तपस्येच्या बळावर, वाटेत येणारे संकटांचे पहाड फोडून अन् कंटकांच्या रांगा ओलांडून, एखादा सामान्य मनुष्य केवढे असामान्य यश मिळवू शकतो, हे अण्णासाहेबांनी आपल्या उदाहरणानेच सर्वांना दाखवून दिले होते. लोकांनी केलेल्या कौतुकाचा आणि गौरवाचा मात्र त्यांच्या मनावर मुळीच परिणाम झाला नाही. कारण यशाने हुर-ळून जाणे किंवा अपयशाने खचून जाणे त्यांच्या स्वभावातच नव्हते.

बी. ए. नंतर एम्. ए. च्या परीक्षेला बसायचे अण्णासाहेबांनी ठरविले. बी. ए. परीक्षेतील यशामुळे त्यांना हा उत्साह आला होता. तथापि उत्साह वाढला, तरी अडचणी काही कमी झाल्या

नव्हत्या. त्याही वाढल्या होत्या. खर्चही वाढला होता. तो भागवण्यासाठी आणखी शिकवण्या धराव्या लागल्या. सैन्यातील अधिकाऱ्यांना आठवड्यातून तीन तास गणित शिकवून, त्याचा मोबदला म्हणून प्रतिमासी २५ रुपये ते मिळवीत. आणखी वेगळ्या शिकवण्या होत्याच! अण्णासाहेबांचा उत्साह दांडगा, त्यामुळे फावल्या वेळात आपल्या पत्नीलाही ते शिकवीत. अशा खडतर परिस्थितीतून वाट काढीत ते एम्. ए. च्या परीक्षा मंडपापर्यंत येऊन ठेपले. इ. स. १८८७ साली ते एम्. ए. च्या परीक्षेला बसले सुद्धा; पण त्या परीक्षेत यशस्वी न झाल्यामुळे व संसार आणि अर्थार्जन या दोन्ही आघाड्यावर योग्य तो समतोल साधता न आल्यामुळे त्यांनी परीक्षेचा नाद सोडून दिला आणि ते सरळ नोकरीच्या मागे लागले.

पण नोकरी तरी लगेच कुठली मिळणार! अन् मिळाली तरी ध्येयवादी अण्णासाहेबांना ती कशी मानवणार? मग त्यांनी शिकवण्या करूनच अधिक पैसे मिळवावयाचे ठरवले. मुंबईतल्या निरनिराळ्या ठिकाणच्या तीन शाळात अण्णासाहेब शिक्षकाचे काम करीत. त्यात आठ आठ तास मोडत.

पहाटे साडे चार वाजता उठायचे. रात्री ठेवलेला भात दही घालून खायचा. मग गिरगावातून निघायचे ते माजगावच्या शाळेत पोचायचे. तिथे साडे सात वाजेपर्यंत शिकवायचे, एक शिकवणी करायची. नऊ वाजता चहा व पाव पोटात ढकलायचा आणि ट्रामने युरोपियन मुलींच्या हायस्कुलात जायचे. तिथले शिकवणे संपले, की पारशी मुलींच्या शाळेत पळायचे. तिथून घरी येऊन जेऊन थोडी विश्रांती. दुपारी तीनच्या सुमाराला मराठा हायस्कुलमध्ये जायचे. मग फोर्टमधले एक हायस्कुल गाठायचे. सबंध दिवस ही

अशी धावपळ करायची. जीव थकून गेलेला असायचा. रात्री दहा वाजता घरी आल्यावर झोप डोळ्यावर तरंगत असे. पण अण्णासाहेब लगेच झोपत नसत. पत्नीला व मुलांना नित्य काही तरी नवीन शिकवल्याशिवाय त्यांचे डोळे मिटतच नसत.

वेळेची, पैशाची, इतकेच काय; शब्दांचीही काटकसर करण्याची त्यांनी स्वतःला सवय लावून घेतली होती.

प्रारंभापासून अण्णासाहेबांना वाचनाचा नाद होताच. आता तो बळावला. विशेषतः आगरकरांचे स्त्रियांच्या दुर्दशेविषयीचे विचार वाचताना त्यांच्या काळजात कालवाकालव होऊन जाई. बालविवाह, विधवांचे केशवपन, शिक्षण नसल्यामुळे स्त्रियांची क्षणोक्षणी होणारी परवड यासंबंधीचे लेख त्यांच्या अंतःकरणाला जाऊन भिडत.

## समाजसेवेचे स्वप्न

आगरकरांचे विचार वाचून व समाजातील स्त्रियांची दुःस्थिती पाहून दिवसेंदिवस अण्णासाहेब अधिकाधिक चिंतामग्न होऊ लागले. आपण स्त्रियांची ही दुःस्थिती पालटून टाकण्यासाठी काही तरी केले पाहिजे, असे त्यांना उत्कटतेने वाटू लागले, पण त्यांना मार्ग गवसत नव्हता. नुसते लिहून, सभासंमेलनातून चर्चा करून अगर ठराव करून काही साधेल, यावर मात्र त्यांचा मुळीच विश्वास नव्हता. बोलण्यापेक्षा करण्यावर त्यांचा प्रथमपासूनच भर होता. आता काही तरी करायचे, या निकराच्या निर्णयाला ते येऊन भिडले होते. ते ‘ काही तरी ’ जे होते, तेच त्यांना अजून आकलन होत नव्हते.

अण्णासाहेब असे विचारमग्न होते, जेवत–खात असून आणि

नोकरी व्यवसायाचा व्याप नीट संभाळत असूनही सचिंत होते. आणि याच वेळी त्यांच्यावर आणखी एका दुःखाचा वज्राघात झाला. त्यांच्या पत्नी राधाबाई इ. स. १८९१ साली मृत्यू पावल्या. या आघातामुळे अण्णासाहेबांच्या दुःखात आणखीच भर पडली. पण त्यांच्या दुःखाची लोकांना काय कल्पना?

राधाबाईंचा मृत्यू होताक्षणीच अनेक कुमारिकांचे बाप त्यांचे उंबरे झिजवू लागले. अण्णासाहेब तेव्हा सारे तेहतीस वर्षांचे होते. शिवाय, बी. ए. होऊन चांगले द्रव्यार्जन करणारे. त्याच वेळी प्रो. गोपाळ कृष्ण गोखले यांनी त्यांना पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात गणिताचे प्राध्यापक म्हणून बोलावून घेतले. तिथे त्यांना १०० रुपये पगार मिळणार होता. हा पगार कमी होता; पण टिळक, गोखले, आगरकर यासारख्या देशभक्त व ध्येयनिष्ठ सहकाऱ्यां· बरोबर काम करायला मिळणार होते. अण्णासाहेबांना ही मोठी सुवर्णसंधी वाटली व ती त्यांनी तत्काळ घेतली.

दि. १५ नोव्हेंबर १८९१ या दिवशी अण्णासाहेब पुण्यात आले व फर्ग्युसन कॉलेजातील गणिताच्या प्राध्यापकाच्या सिंहासनावर जाऊन बसले. पुण्यातही त्यांच्याकडे अनेक वधुपिते खेटे घालू लागले. अण्णासाहेबांना एक लहान मुलगा होता. त्याचे पोषण करायचे म्हणजे आज ना उद्या लग्न करावे लागणारच होते, उधळलेल्या घरप्रपंचाची मांडामांड करायला हवीच होती. लग्न करायचे ठरल्यावर ते विधवेशीच करायचे हेही त्यांनी नक्की केले. विधवेशी लग्न! म्हणजे साक्षात् समाजाच्या क्रोधाला आव्हान! बहिष्काराला निमंत्रण! अण्णासाहेबांना या सगळ्या गोष्टींची जाणीव होती. पण ते जितके दिसायला साधे नि भावडे, तितकेच वृत्तीचे कणखर आणि खडे.

त्यांचे एक मित्र होते. नरहरपंत जोशी हे त्यांचे नाव. त्यांची गोदूबाई नावाची एक बहीण होती. बिचारी बालविधवा होती. लहानपणीच तिचा नवरा निर्वतला होता. पुन्हा लग्न–संसार या गोष्टी असंभवच! पण गोदूबाईंचे वडील, भाऊ हे सुधारक विचाराचे होते. त्यांनी अण्णासाहेबांचा ‘ विधवेशीच लग्न करीन ’ हा निर्धार ऐकला आणि ‘ गोदूबाईशी लग्न करणार का ? ’ असा अण्णासाहेबांना प्रश्न केला. तो प्रश्न ऐकून अण्णासाहेबांना आश्चर्य वाटले, तसाच आनंदही. थोड्या विचारान्ती अण्णासाहेबांनी आपला होकार कळविला.

गोदूबाई तेव्हा मुंबईला पंडिता रमाबाईच्या शारदासदनात होती. ती पुण्याला आली.

## समाजक्रांतीचा श्रीगणेशा

दि. ११ मार्च १८९३ या दिवशी पुणे येथे डॉ. भांडारकर यांच्या बंगल्यात अण्णासाहेबांनी गोदूबाई या बालविधवेशी लग्न लावून आपल्या कार्याचा शुभारंभ केला. त्यांच्या या लग्नसमारंभाला ३०–४० मंडळी उपस्थित होती. लग्न जुन्या पद्धतीप्रमाणे झाले. दुपारी भोजनही झाले. पंडिता रमाबाईंनी गोदूबाईंना अहेर-ओटी केली. उपस्थितांपैकी काहींनी अण्णासाहेबांचे अभिनंदन करणारी भाषणे केली. अण्णासाहेबांनी आपल्या पत्नीचे–गोदूबाईचे–नाव आनंदी असे ठेवले. त्यांच्या प्रथम पत्नीच्या निधनामुळे त्यांच्या संसारातला आनंद लोपला होता. या नव्या पत्नीच्या आगमनामुळे तो आनंद परत आला होता.

एका बालविधवेशी लग्न करून अण्णासाहेबांनी सामाजिक समतेचे रणशिंग फुंकले होते. महाराष्ट्रात त्या काळी हा पुनर्विवाह फार गाजला–नावाजला. हा पुनर्विवाह झाला आणि अण्णासाहेब–

आनंदीबाई या दांपत्यावर एकाच वेळी सत्काराची पुष्पवृष्टी आणि धिक्काराची आगपाखड झाली. सुधारक, केसरी यासारख्या वृत्तपत्रांनी अण्णासाहेबांचे या विवाहाबद्दल लेख लिहून अभिनंदन केले. सुधारकाचार्य आगरकर यांनी तर या नवदांपत्याला आपल्या घरी जेवायला बोलावून त्यांचा सत्कार केला. आनंदीबाईची खणानारळाने ओटी भरली. हे यासारखे काही प्रसंग सोडले, तर सर्व समाजाने त्यांचा धिक्कारच केला.

आनंदीबाईच्या वडिलांनी आपल्या मुलीच्या पुनर्विवाहाला संमती दिल्यामुळे त्यांना मुरुडच्या देवळात ग्रामस्थांनी बारा नमस्कार घालायला लावले. शिवाय, तीन देवळांच्या जीर्णोद्धारासाठी शंभर रुपये द्यायला लावले. अण्णासाहेबांवर तर मुरुडकरांनी पूर्ण बहिष्कार घातलाच; पण त्यांच्या आई-वडिलांना व भावंडांनाही वाळीत टाकले.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडे एक पुराणमताभिमानी गृहस्थ आले व त्यांनी आनंदीबाई आणि अण्णासाहेब या दोघांना आपल्यापुढे बसवून चांगली दीड तासपर्यंत त्यांना यथेच्छ शिव्यांची लाखोली वाहिली. जाताना ते गृहस्थ म्हणाले, 'तुम्हा काळतोंड्यांचे पुनश्च दर्शनसुद्धा व्हायला नको.'

लग्नानंतर अण्णासाहेब पहिल्यांदा जेव्हा मुरुडला आले, तेव्हा गावावर एखादे अरिष्ट कोसळावे, तसे मुरुडकरांनी चेहरे केले. हर्णैच्या बंदरावर अण्णासाहेब आनंदीबाईसह उतरले, तेव्हा मुरुडला जायला त्यांना गाडीदेखील मिळेना. दुसऱ्या दिवशी गावकी जमली व तीत अण्णासाहेबांवरचा बहिष्कार कसा अमलात आणायचा याविषयी निर्णय घेण्यात आला. धोंडोपंतांना एका बैठकीवर घेऊन बसू नये, ते ज्या सभेत असतील, तिथे जाऊ नये व त्यांनी

पुन्हा गावात येऊ नये, यासाठी त्यांचे बंधू भिकाजीपंत यांच्यावर बहिष्कार घालावा.

अण्णासाहेबांनी हा सर्व बहिष्कार, हरताळ, निमूटपणे सोसला. त्यांचे म्हणणे असे, "बहुजन समाजाच्या मताविरुद्ध मी एक गोष्ट केली आहे व तिजबद्दल मला जो त्रास होईल तो भोगण्यास मी तयार असले पाहिजे. समाज ज्या रीतीने वागवील त्या रीतीची वागणूक मी सहन केली पाहिजे म्हणजे कालांतराने समाजालाच आपल्या कडकपणाबद्दल वाईट वाटून मला तो बऱ्या रीतीने वागवू लागेल. ज्या समाजात रूढ व्हावी अशा हेतूने मी ही गोष्ट केली, त्या समाजाशी होईल तितका संबंध ठेवण्याचा मी यत्न केला पाहिजे. मात्र तसे करताना समाजाला मी डिवचता कामा नये."

समाजाच्या शिव्या आणि ओव्या, सत्कार आणि धिक्कार स्तुतीच्या माळा आणि निंदेच्या झळा अण्णासाहेबांनी सबंध आयुष्य-भर याच स्थितप्रज्ञ व शांत वृत्तीने स्वीकारल्या. तथापि मुरुडच्या घरात त्यांना जेव्हा आपल्या भावंडांशी व आई-वडिलांशी साधे संभाषण करण्याचीसुद्धा बंदी होण्याचा रागरंग दिसू लागला, तेव्हा मात्र त्यांचे काळीज करपून गेले. अण्णासाहेब आपल्या आत्म-वृत्तात या स्थितीचे वर्णन करतात, "माझा शारीरिक छळ झाला, तर तो मी आनंदाने सोसला असता, पण प्रियजनामधील प्रेमपाश छेदणारा हा नियम मात्र मला असह्य झाला." मुरुडच्या मुक्का-मात, सबंध महिनाभरात त्यांना आपल्या आईशी वा बहिणीशी एक शब्दही बोलता आला नाही. त्यांना मुळी घरात यायलाच बंदी होती. मग रात्री–अपरात्री आई आणि बहीणच लपत-छपत त्यांच्याकडे येत व भीत भीत दोन शब्द बोलून परत जात.

अशाही अवस्थेत काही मृदु मनाचे आणि प्रेमळ अंतःकरणाचे

लोक त्यांना भेटत. ते त्यांना घरी बोलावीत; पण समाजाच्या भीतीने जेवायला मात्र वेगळे बसवीत. आनंदीबाईंना कुंकू लावायचे, तर तेही लहान मुलीकडून.

समाजाने पुकारलेला हा बहिष्कार आणि चालविलेला छळ पाहून अण्णासाहेबांच्या मनाला अपरिमित दुःख होई; पण धीराने व धीमेपणाने, मुखावरचे हासू पुसू न देता आणि अंतःकरणातल्या आनंदीवृत्तीला काजळी येऊ न देता, ते आपली वागणूक सभ्यतेची व सौजन्याची ठेवीत.

आपल्यावर एखादा प्राणघातक हल्ला होऊन त्यात आपले काही बरेवाईट झालेच, तर आपल्या मागे आपल्या नवपरिणित वधूचे-आनंदीबाईंचे-हाल होऊ नयेत, तिला उपजीविकेचे एखादे साधन असावे, अशा हेतूने अण्णासाहेबांनी आनंदीबाईंना नागपूरच्या डफरीन इस्पितळात नर्सिंगचा कोर्स शिकायला पाठवले व ते स्वतः गोपाळराव आगरकरांच्या घरी राहायला गेले. प्रारंभापासूनच त्यांची राहणी साधी व स्वावलंबी. आगरकरांच्या घरी तर त्याचा पुरेपूर प्रत्यय आला झाडणे, सारवणे, कपडे धुणे, स्वयंपाकाची भांडी घासणे–सगळी कामे ते करीत. आपण प्राध्यापक आहो, तेव्हा असली हलकी कामे कसली करायची ? असा विचार त्यांच्या मनातही आला नाही.

## अबलांचे कैवारी

आपण पुनर्विवाह केला, एका बालविधवेला पुन्हा संसारात आणून तिच्या जीवनात आनंदाची फुलबाग फुलवली, त्यासाठी होणारे व्याप ताप सहन केले, बहिष्कार सोसला; आता आपले या समाजाविषयीचे कर्तव्य संपले, असा विचार अण्णासाहेबांच्या मनात कधीही आला नाही. उलट आपला पुनर्विवाह ही भावी

सुधारणांची नांदी ठरावी, अशीच त्यांची इच्छा होती. आपल्याप्रमाणेच अनेक विधुरांनी धाडसाने पुढे येऊन बालविधवांशी विवाह करावे, विधवांच्या केशवपनाविरुद्ध त्यांनी बंडाचा झेंडा उभारावा; विधवा असो की परित्यक्ता असो, संसारी स्त्री असो की कुमारिका असो–त्यांच्या शिक्षणार्थ समाजसुधारकांनी प्रयत्न करावे असे त्यांना उत्कटतेने वाटत असे. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी व उन्नतीसाठी ते स्वतः तर अष्टौप्रहर राबत होतेच !

स्वतःचा पुनर्विवाह झाला, त्याच्या दुसऱ्या वर्षापासून त्यांनी पुनर्विवाहितांचे मेळावे भरवायला सुरुवात केली. इ. स. १८९४ सालचा पहिला मेळावा अवघा २२ माणसांचा होता व तो अण्णासाहेबांच्या घरीच भरला. त्याला गोपाळराव आगरकर अध्यक्ष होते.

नंतर पुनर्विवाहासंबंधी लोकात सहानुभूती निर्माण व्हावी, या हेतूने त्यांनी व्याख्यानांचे दौरे आरंभले. कॉलेजला मे महिन्याची किंवा आणखी कोणती सुटी असेल, तेव्हा ते व्याख्यानासाठी बाहेर पडत. कॉंग्रेसच्या अधिवेशनांनाही ते उपस्थित राहात. जिथे कुठे माणसांचा मेळा दृष्टीस पडे, तिथे जाऊन त्या लोकांच्या विरोधाची पर्वा न करता शांतपणे त्यांना आपले विचार ऐकवायचेच, असे त्यांचे व्रत होते. हे प्रवाससुद्धा ते अत्यंत काटकसरीने करीत. रेल्वेचा प्रवास असेल, तर तो तिसऱ्या वर्गानेच व्हायचा. टांगा–छकडासुद्धा जरुरीपुरता. बहुशः पायीच हिंडायचे. अण्णासाहेबांचे वक्तृत्व प्रभावी म्हणावे, तर मुळीच नाही. तथापि अंतःकरणाची तळमळ मोठी. जे काही सांगायचे ते आर्जवाने, विनयाने आणि दयार्द्र मनाने. शिवाय 'आधी केले, मग सांगितले' ही वृत्ती. त्यामुळे सभेला ५–१० माणसे असली, तरी अण्णासाहेबांचे विचार त्यांच्या

अंत:करणाला भेदून जात. व्याख्यानानंतर या सत्कार्यासाठी ते लोकांना वर्गणी देण्याचे आवाहन करीत. त्यातही लोकांनी दिल्याचा आनंद नाही वा न दिल्याचे दु:ख नाही!

स्वत:च्या पुनर्विवाहाच्या वर्षीच त्यांनी 'विधवा विवाह-प्रतिबंधक-निवारक मंडळी' नावाची संस्था स्थापन केली होती. तिच्या द्वारे ते विधवांचे विवाह लावून देण्याच्या प्रयत्नात असत. परतु विधवाविर्वाह करू इच्छिणारे तरुण अगदी थोडे असत. आणि त्यांनाही समाजाची भीती वाटत असल्यामुळे, प्रत्यक्ष विवाह होईपर्यंत त्यांच्या मनात परस्परविरोधी विचारांचा गोंधळ उडून जाई. शिवाय, एकदा एखाद्याने पुनर्विवाह केला तरी शेवटपर्यंत तो त्या पुनर्विवाहितेशी–आपल्या पत्नीशी–एकनिष्ठ राहील, याचाही विचार करायला हवा असे. त्यासाठी केवळ विधवाविवाह किंवा पुनर्विवाह यासारख्या चळवळी करूनच भागणार नाही, तर स्त्रियांचे आश्रम व त्यांना शिक्षण देणाऱ्या संस्थाही स्थापन केल्या पाहिजेत, अशा विचारावर अण्णासाहेब आले. मनात विचार आला, की तो कृतीतही आणायचा, असा अण्णासाहेबांचा बाणा.

प्रारंभी त्यांनी ५–६ विधवांच्या शिक्षणाची व राहाण्याची सोय करण्यासाठी एक आश्रम काढला. त्याच्या खर्चासाठी पदरचे १००० रुपये दिले. इ. स. १८९६ साली अनाथ बालिकाश्रम स्थापन झाला, त्यासाठी अण्णासाहेबांनी आपली ५००० रुपयांची विमापॉलिसी (आपल्या नावाची जाहिरात न करता) अर्पण केली.

इ. स. १८९९ साली पुण्यात प्लेगची साथ आली. सगळ्या गावातले लोक गावाबाहेर जाऊन राहिले. अण्णासाहेबांचा आश्रम कुठे जाणार? अशा वेळी रा. ब. गोखले नामक एक सत्प्रवृत्त गृहस्थ पुढे सरसावले. त्यांनी पुण्यापासून दूर ३ मैलावर असलेली आपली

६ एकर जागा आश्रमासाठी फुकट दिली. जागा मिळाली; पण इमारत? राहायचे कुठे? उघडा माळ तो. मग प्रारंभी फक्त ५०० रुपये खर्च करून चार खोल्यांचीं, दगडामातीची, साधी व छोटी पर्णकुटी उभारण्यात आली व नव्या जागेत आश्रम सुरू झाला.

दिवसभर फर्ग्युसन कॉलेजात शिकवावे, गावातली कामे करावी व संध्याकाळी पायी चालत, काटे खडे तुडवीत, दगड-धोंडे ओलांडीत आश्रमात जावे, रात्रभर तिथे राहून पहाटे तिथल्या मुलींना शिकवावे व सकाळ उजाडताच पुन्हा कॉलेजसाठी गावात यावे, असा अण्णासाहेबांचा दिनक्रम चालू झाला.

प्राचीन काळी आपल्या या देशात अनेक ऋषीमुनी होऊन गेले. ते राना-वनात राहून तपश्चर्या करीत व देह कष्टवीत. अण्णासाहेबही त्याच कोटीतले महापुरुष. त्यांचीही ही एक तपश्चर्याच होती आणि तपश्चर्या म्हटले, की तिला फळ मिळालेच पाहिजे. अण्णासाहेबांच्या तपश्चर्येलाही हळूहळू फळप्राप्ती होऊ लागली. त्यांची सचोटी आणि कार्याविषयीची चिकाटी जसजशी लोकांच्या नजरेत भरत गेली, तसतसे अनेक श्रीमंत दाते त्यांच्या कार्याला मदत करायला पुढे आले.

राजस्थानातल्या एका संस्थानचे कोशाध्यक्ष कोणी फाटक नावाचे मराठी गृहस्थ होते. ते व त्यांची पत्नी रामेश्वराच्या यात्रेला निघाले. वाटेत पुण्याला उतरले, अण्णासाहेबांचा आश्रम पाहिला, प्रभावित झाले आणि रामेश्वर यात्रेसाठी बाजूला ठेवलेले ५०० रुपये अण्णासाहेबांच्या हातावर ठेवून मोकळे झाले. म्हणाले. 'माझा रामेश्वर इथेच भेटला!'

दुसरे पंडित नावाचे गृहस्थ. तेही राजस्थानातलेच. राजकोटला राहणारे. त्यांनी आश्रमाची सुव्यवस्था पाहून चटकन् चेकबुक काढले.

अनुक्रम ............... वि .........
क्रमांक.................नोंद दि..........


तीनशे रुपयांचा आकडा लिहिला. खाली स्वाक्षरी केली आणि अण्णासाहेबांच्या पुढे चेक ठेऊन सांगितले, ' हे तीनशे. तात्पुरते. आता प्रतिमासी ५० रुपये पाठवीत जाईन. मला तुमचे कार्य आवडले ! '– पुढे त्यांनी ५० चे ७५ केले इ. स. १९०४ साली अण्णासाहेबांनी संस्थेसाठी इमारत बांधायला काढली. पंडितांनी थैली सोडली आणि एक सहस्र रुपये अण्णासाहेबापुढे ठेवले. हे दातृत्व पाहून अण्णासाहेबांचे हृदय भरून आले. त्यांनी पंडितांना कृतज्ञतेचे पत्र पाठविले तर पंडितांनी कळविले, ' अहो, मी उपकार केले नाहीत तुमच्यावर. तुम्ही व तुमच्या संस्थेनेच उलट माझ्या धनाला योग्य मार्ग दाखवून मला ऋणी केले आहे. ' यानंतर इमारत पुरी होईपर्यंत प्रतिमासी ५०० रुपये पंडितांकडून येत.

असेच एकदा नाटककार देवल आश्रमात आले. त्यांनी ३००० रुपये अण्णासाहेबांच्या हातावर ठेवले आणि म्हटले, ' या पैशातून आश्रमात एक गीतामंदिर बांधा. मुलींपुढे चांगले देवा-धर्माचे आदर्शही राहातील व माझीही इच्छा तृप्त होईल ! '

अर्थात असल्या देणग्या मिळाल्या म्हणून अण्णासाहेब काही स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी आपली सभा–व्याख्यानेही थांबवली नाहीत. पूर्वीच्याच निष्ठेने व चिकाटीने ते घरोघरी, चाळीचाळीतून, पेठेपेठेतून, खेड्याखेड्यातून, शहराशहरातून हिंडत; स्वतःची मते व संस्थेची माहिती लोकांच्या कानावर घालीत; ते देतील तो पै-पैसा, प्रसंगी नुसत्या सदिच्छा नि आशीर्वाद–गोळा करीत आणि परत येत.

स्वदेशी धनिकांनी साह्य दिले, तसेच परदेशी श्रीमंतांनीही मदत केली. इंग्लंडातील मिस् मॅनिंग ही बाई १८९९साली आश्रमात आली

व अण्णासाहेबांचे हे महाकार्य पाहून प्रसन्न झाली. ती म्हणाली, ' मी प्रतिवर्षी ३० रुपये देत जाईन. '– अण्णासाहेब म्हणाले, ठीक आहे. द्या. माझा हात पुढेच आहे. संस्थेसाठी कुबेराने सगळी संपत्ती दिली तरी मी घेईन. '

असाच एक विदेशी न्यायाधीश. व्हिटवर्थ हे त्याचे नाव. त्याने नुसती आश्रमाची महिती ऐकली अन् तो प्रतिवर्षी ५० रुपये पाठवू लागला. मृत्युपत्रात तर त्याने ५००० रुपये अण्णासाहेबांच्या आश्रमाला ठेवले !

अशा देणग्या मिळाल्या, असे आशीर्वाद आणि सदिच्छा मिळाल्या, की अण्णासाहेबांना नवा हुरुप येई. राजे-महाराजे आणि म. गांधी, अरविंद बाबू, लाला लजपतराय, पं. नेहरू, स्वातंत्र्यवीर सावरकर यासारखे राष्ट्रीय नेते आश्रमात येत, अण्णासाहेबांनी उभारलेली ती सृष्टी पाहात आणि मोकळ्या मनाने त्यांना धन्यवाद देत; पण सामाजिक बहिष्काराच्या भीतीने त्यांचे आप्त अजूनही त्यांच्याकडे फिरकत नव्हते. अण्णासाहेबांना त्याचे दुःख होई. एक प्रसंग असा घडला–

अण्णासाहेबांची आई व बंधू पंढरपूरहून परतत होते. पुण्यात राहिले होते. अण्णासाहेबांना कळले आणि ते धावतच तिथे गेले. डोळ्यात पाणी आणून आईला व बंधूंना म्हणाले, ' हे पाहा, माझ्यावर समाजाचा राग आहे. तेव्हा तुम्ही माझ्या घरी या, असे मी तुम्हाला म्हणत नाही. पण एक मात्र तुम्ही करावे, अशी माझी फार इच्छा आहे. तुम्ही माझ्या आश्रमात या. आपल्या मुलाने–भावाने कोणते कार्य आरंभले आहे, ते कसे चालवले आहे, हे पाहा तरी एकदा ! '

आणि मग आई व त्यांचे बंधू आश्रमात आले. पाहता पाहता प्रसन्न झाले. त्यांचे डोळे अश्रूंनी तुडुंबले. आईने अण्णासाहेबांना आपल्या अश्रूंनी न्हाऊ घातले. आणि बंधूंनी? त्यांनी तर आपल्या भावाला मिठीच मारली. चौदा वर्षांनी नंदिग्रामी रामचंद्रांनी भरताची भेट घेतली, त्याला कुशीत घेऊन कुरवाळले, तो सोहळा याहून काय निराळा असेल !

## धन्य धन्य कर्वे वंश !

" मी अत्यंत सुखी आहे. मला शक्य होते, ते मी सारे केले. केवळ विधवांसाठीच नव्हे, केवळ स्त्री-शिक्षणासाठीच नव्हे, तर हरिजनासाठीही मी शक्य तितका झटलो 'जात-पात तोडक मंडळा' चेही कार्य मी केले. 'इच्छा तेथे मार्ग' हे माझे सूत्र. नवा मार्ग काढण्यावर माझ्या मनाचा सदा भर. जीवनाचे नवे नवे मार्ग मी शोधीत गेलो, म्हणूनच मला माझ्या जीवनात आनंद लुटता आला असे मला वाटते. "

वयाची शंभरी ओलांडून गेल्यावर अण्णासाहेबांनी काढलेले हे कृतार्थतेचे उद्‌गार! खरोखरच असे भाग्य कितिकांना लाभले असेल! फार थोडयांना! त्या 'फार थोड्या' तले अण्णासाहेब एक. एकूण १०५ वर्षांचे दीर्घायुष्य त्यांना लाभले. या प्रदीर्घ आयुष्याचा कणन् कण त्यांनी हिंदू समाजाच्या सेवेसाठी आणि सुधारणेसाठी वेचला. क्षणाचाही आळस केला नाही, कंटाळा केला नाही. अक्षरशः शून्यातून विश्व पाहिले. एक लहानसे बीज पेरून कर्तृत्वाचा विशाल वटवृक्ष निर्माण करून दाखविला. आणि हे सारे धीमेपणाने, शांततेने, कुणावर न रागावता, कुणाशी न भांडता. त्यांचे भांडण होते, ते

राक्षसी रूढींशी ! आणि ते भांडण त्यांनी अखेरपावेतो जिद्दीने, निष्ठेने, सातत्याने चालूच ठेवले. शेवटी या देशात विधवांचे केशवपन, त्यांचा छळ, त्यांचा धिक्कार कोणी करीनासे झाले; उलट विधवांशी विवाह, पुनर्विवाह करणारे, त्यांच्याशी सुखा-समाधानाने खेळीमेळीचा संसार करून त्यांच्या जीवनात हिरवळ निर्मिणारे असंख्य तरुण या देशात अहमहमिकेने पुढे आले. शेकडो-हजारो स्त्रियांच्या शाळा निघाल्या आणि त्यातून लक्षावधी मुली-स्त्रिया शिकू लागल्या. हे सारे पाहून अण्णासाहेबांना पराकाष्ठेचा संतोष झाला. आनंद झाला. देशातल्या नाना विद्यापीठांनी त्यांना त्यांच्या शंभरीचे निमित्त साधून त्यांच्या समाजसेवेचा गौरव म्हणून पदव्या समर्पण केल्या. भारताच्या राष्ट्रपतींनी तर त्यांना ‘ भारतरत्न ’ म्हणूनच गौरविले. आता आयुष्यात भोगण्यासारखे, करण्यासारख काही उरले नाही. अशा स्थितीत समाधानाने देह ठेवणे तेवढे उरले. आणि अण्णासाहेबांनी दि. ९ नोव्हेंबर १९६२ रोजी खरोखरीच देह ठेवला. संतोषाने ! समाधानाने ! !

# कर्मवीर भाऊराव पाटील

इ. स. १९१४ सालच्या मे महिन्यातील गोष्ट. कोल्हापूर येथील टाऊन हॉल भोवतालच्या बागेत असलेल्या व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्यावर कुणी अज्ञात इसमाने डांबर आणून ओतले ! इंग्रजी अमदानीचा तो ऐन मध्यान्ह काल ! ब्रिटिश साम्राज्यशाहीवर सूर्यही न मावळण्याचे ते दिवस ! आणि अशा वेळी साक्षात् त्यांच्या राणीच्या पुतळ्यावर कोणी तरी डांबर ओतून तो विद्रूप केलेला! साहजिकच शोधाशोध करायला सुरुवात झाली; पण डांबर ओतणारा तो माणूस काय असा सुखासुखी सापडणार थोडाच ! त्याने इंग्रज सरकारच्या आणि कोल्हापूर संस्थानच्या शिपाई-प्याद्यांना पुरता गुंगारा दिला. झाले ! गुन्हेगार सापडत नाही म्हणताच 'चोर सोडून संन्याशी सुळी' द्यायची प्रथा सर्वत्र असतेच ! कोल्हापुरातल्या काही मंडळींनी परस्पर द्वेषाचे प्रकरण यातच घुसडून आपल्या विरोधकांचा या निमित्ताने कायमचा काटा



काढायचे ठरविले. त्या दृष्टीने त्यांच्या कारस्थानाची चक्रे झपा-ट्याने फिरू लागली.

कोल्हापुरात तेव्हा अण्णासाहेब लठ्ठे नावाचे एक तरुण, तडफदार कार्यकर्ते होते. ते पुरोगामी व सुधारक विचाराचे असून, तिथल्या वसतिगृहाचे सुपरिटेंडेंट होते. गृहस्थ तसा मनमिळावू, निरलस वृत्तीचा आणि कर्तबगार होता; पण याचमुळे त्याच्या-विषयी कोल्हापुरातल्या एका विशिष्ट गटाच्या मंडळींच्या मनात मत्सर निर्माण झाला. येनकेनप्रकारेण त्याचा काटा काढून टाकला पाहिजे, असे लठ्ठे यांच्या विरोधकांनी ठरविले व अशा वेळी हे डांबरफेकीचे प्रकरण घडले.

निटवे नावाचे एक गृहस्थ लठ्ठे यांच्या विरोधक मंडळीत अग्रभागी होते. त्यांनी लठ्ठे यांची देशभक्ती व इंग्रज विरोध या गोष्टींची सांगड घालून या प्रकरणी लठ्ठे यांनाच बळी द्यायचे ठरविले. झाले! विचार ठरला! पण सरकार दरबारी एखादी गोष्ट सिद्ध करायची म्हणजे साक्षीदार लागतो. मग साक्षीदार सिद्ध करायचे काम सुरू झाले. लठ्ठे यांचे ज्याच्याशी भांडण झाले आहे किंवा लठ्ठे यांच्याविषयी ज्याला थोडाफार राग असणे शक्य आहे, असा साक्षीदार मिळाला तर फारच चांगले होणार होते. तसा शोध घेतला आणि एक साक्षीदार मिळालाही, पण तो तरुण तेव्हा कोल्हापूरला नव्हता, कारगावला होता. त्याला निटव्यांनी तार केली आणि तो आला. निटव्यांच्या जैनेंद्र छाप-खान्यात उतरला. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या, जेवणे झाली. रात्र झाल्यामुळे बिछाने अंथरले. पण आपल्याला कशाला बोला-वले, हे त्याला कळेना. तो विचार करीत राहिला. एवढ्यात

निटवे तिथे आले व त्यांनी आपले जाळे पसरायला सुरुवात केली. ते त्या तरुणाला म्हणाले,

'हे पाहा, कोल्हापूरच्या व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याला कोणी तरी डांबर फासले आहे. आमचा निश्चित कयास आहे, की हे काम त्या अण्णासाहेब लठ्ठचाचे आहे. केवळ आम्हाला एक साक्षीदार हवा आहे. ते काम तू कर. तू छातीठोकपणे साक्ष दे की 'या लठ्ठयांनीच राणीसाहेबांच्या पुतळ्याला डांबर फासले. मी माझ्या डोळ्यांनी ते पाहिले.'

हा सगळा प्रकार पाहून तो तरुण स्तिमितच झाला! कोणा एका माणसाविरुद्ध आपण उगाचच साक्ष द्यायची आणि त्याला तुरुंगाच्या गजाआड ढकलायचा, हे काही त्याला पटेना. शिवाय जी गोष्ट आपण डोळ्यांनी पाहिली नाही, ती अमक्या तमक्याने केली, असे खोटेच कसे सांगायचे? त्याचे पापभिरु आणि सत्यनिष्ठ मन ही हलकट गोष्ट करायला, खोटी साक्ष द्यायला मुळीच तयार होईना. तो एकदम ठामपणे म्हणाला,

'हे काम तुम्ही मला सांगू नका. मी ते करणार नाही. असत्य बोलण्याची मला सवय नाही!'

निटवे चमकले, पण सावरून म्हणाले,

'पण लठ्ठयांनी तुझे पूर्वी नुकसान केले आहे. अवेळी दाढी केल्याबद्दल शिक्षा म्हणून तुला त्यांनी बोर्डिंगमधून घालवून दिले होते, आठवते ना?'

'होय. ते आठवते; पण त्याचा बदला अशा रीतीने घेण्याचे काय कारण? आणि जी गोष्ट मी पाहिली नाही, ती पाहिली असे खोटेच का व कसे सांगायचे? मला ते शक्य नाही.'

त्या तरुणाचे ते तेजस्वी उद्‌गार ऐकून निटवे काळे ठिक्कर पडले. पण तेही काही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. ते दात-ओठ खात मनातल्या मनात म्हणाले, 'बरंय बच्चंमजी ! तू बऱ्या बोलाने माझे काम करीत नाहीस तर ! पण आता ध्यानात ठेव, त्या लठ्ठ्याला तर या प्रकरणी चांगला गोवतोच; पण तुलाही यथेच्छ भाजून काढतो. मग पहातो, तुझा तो दृढनिश्चय कसा काय टिकतो, ते ! '

– आणि मग निटव्यांनी जे कृत्य केले किंवा करवले, ते महा-भयंकर होते, अंगावर अक्षरश: शहारे आणणारे होते ! तो तरुण आपल्याला वश होत नाही, असे पाहून ते सहज तिथून बाहेर गेले. इकडे त्या तरुणाला श्रमामुळे गाढ झोप लागली आणि मग तो गाढ झोपेत आहे, असे दिसताच निटव्यांनी त्या इमारतीचा तळमजला पेटवून दिला. पाहता पाहता तो आग अशी भडकली, की बोलता सोय नाही. तशातच पहाटेचा वारा सोसाट्याने वाहू लागला आणि त्यामुळे आगीने साक्षात तांडव नृत्य आरंभले ! 'आग', 'आग' अशा लोकांच्या आरोळ्या, किंकाळ्यांनी वरच्या मजल्यावर झोप-लेला तो तरुण खडबडून जागा झाला. त्याला काही कळेनाच; हा काय प्रकार आहे ? एकाएकी आग कशी लागली? कुणी लावली?

'कुणी लावली ? सांग, आग कुणी लावली ? तूच की नाही ? माझ्या खिशातले पाचशे रुपयेही तूच लांबवलेस, होय की नाही ? ' तो तरुण विचारमग्न होऊन उभा असतानाच, घामा-घूम झालेले आणि राक्षसामारखे हातवारे नाचवीत त्याच्यापुढे उभे ठाकलेले निटवे त्याला दिसले. आणि मग त्याच्या डोक्यात स्वच्छ प्रकाश पडला. आपण निटव्यांच्या दमबाजीला भीक घालीत नाही, असे पाहून स्वत: निटव्यांनीच ही आग लावली आहे व

आग लावण्याच्या आणि पाचशे रुपये चोरण्याच्या अशा खोटयाच दुहेरी आरोपाखाली ते आता आपल्याला पोलिसांच्या ताब्यात देऊन आपला आणखी छळ करण्यासाठी सिद्ध झालेले आहेत, या गोष्टी त्या तरुणाला पूर्णपणे कळून चुकल्या. मात्र तरीही त्याचा निश्चय ढळला नाही. औरंगजेबाच्या दरबारात साक्षात मृत्यूकडे पाहून बेगुमानपणे हसत उभ्या राहणाऱ्या संभाजीचा साहसी आवेश, त्याच्या ठिकाणी प्रकाशमान झाला आणि तो तरुण निठव्यांकडे पहात निश्चयी स्वरात पुन्हा म्हणाला.

'—तुम्ही काहीही केलेत, कोणतेही आळ-आरोप मजवर लादलेत, तरीही मी माझ्या सत्य बोलण्याच्या निश्चयापासून ढळणार नाही ! '

—या दृढनिश्चयी आणि सत्याश्रयी तरुणाचे नाव भाऊराव पाटील. कर्मवीर भाऊराव पाटील म्हणून सबंध महाराष्ट्राला सुपरिचित असलेल्या एका लोकोत्तर विभूतीच्या जीवनातला हा एक तेजस्वी प्रसंग. या प्रसंगात भाऊराव ज्या निष्ठेने, ज्या स्वाभिमानाने आणि ज्या साहसाने वागले, तीच निष्ठा, तोच स्वाभिमान आणि तेच साहस त्यांनी सबंध आयुष्यभर प्रत्येक प्रसंगी दाखविले आणि नुसते दाखविलेच असे नव्हे, तर स्वतःसारखे शेकडो-सहस्रो तरूण त्यांनी आपल्या शाळाशाळातून निर्माण करून दाखविले. भगीरथाने गंगा आणली आणि पृथ्वीतलावर नंदनवन निर्माण केलें, असे पुराणात वर्णन आहे. भाऊरावांनीही आधुनिक काळात तसाच पराक्रम केला. आपल्या अविरत प्रयत्नांनी त्यांनी मागसलेल्या आणि शिक्षणाचा गंधही नसलेल्या लक्षावधी लोकांना सुशिक्षित केले. केवळ मूठभर लोकांच्या दारी वाहात असलेली ज्ञानगंगा त्यांनी सरसकट समाजाच्या परड्या-परसातून नेऊन सोडली. हा

त्यांचा भगीरथ पराक्रम खरोखरीच कौतुकास्पद, गौरवास्पद म्हणा-वयास हवा.

सातारा जिल्ह्यातले कुंभोज गाव हे भाऊरावांचे आजोळ. इ. स. १८८६ सालच्या जून महिन्याच्या २३ दिनांकाला भाऊराव तिथे जन्मले. त्यांच्या मातुश्रींचे नाव गंगाबाई. वडिलांचे नाव पायगौंडा. भाऊरावांचे घराणे जैन मराठ्यापैकी. त्यांच्या कुळातील एक पुरुष 'जिनसेन भट्टारक पट्टाचार्य' या धर्मपीठावर अधिष्ठित झाला होता हिंदू धर्मातील शंकराचार्यांच्या धर्मपीठासारखेच हे जैनांचे धर्मपीठ आहे.

अशा पवित्र आणि चारित्र्यसंपन्न कुळात जन्म लाभल्यामुळे भाऊरावांच्या जीवनावरही या पावित्र्याचा आणि चारित्र्याचा फार मोठा प्रभाव पडला. लहानपणापासूनच त्यांची वागणूक सौजन्याची पण स्वाभिमानाची असे. त्यांचे जवळ जवळ सगळे बालपण आजोळीच गेले. आजोळच्या गावापासून-कुंभोजपासून जवळच वारणा नदी वाहते. या नदीच्या काठावर असलेल्या आंबरायातून मनमुराद हुंदडावे, नदीत डुंबावे, या झाडावरून त्या झाडावर माकडासारख्या उड्या माराव्या, आपल्या मित्राबरोबर नाना प्रकारचे खेळ खेळावे व भरपूर मारामाऱ्या कराव्या असा भाऊरावांच्या बालपणाचा स्वच्छंदी दिनक्रम होता. परमेश्वराने जन्मतःच त्यांना दोन गोष्टींची विशेष देणगी दिली होती. एक धिप्पाड देहयष्टी आणि गडगडाटणारा आवाज.

त्यांच्या लहानपणी कोल्हापूर संस्थानात सत्या नावाच्या एका बेरडाने बंड पुकारले होते. श्रीमंतांना लुटावे आणि लुटलेले धन गरीब गरजूंना वाटावे, हा त्याचा धंदा. त्यामुळे तो श्रीमंतांना कर्दनकाळ वाटायचा, तर गरीबांना परमेश्वरासारखा भासायचा.

हा सत्याप्पा कुंभोज गावचा राहणारा. भाऊरावांच्या मामाचा तर जानी दोस्त. त्याच्या पराक्रमाच्या आणि शौर्याच्या चित्तथरारक कथा उभ्या महाराष्ट्रातल्या आबालवृद्धांच्या परिचयाच्या होत्या. भाऊरावांना तर सत्याप्पाच्या कथा ऐकण्याचे वेडच लागले होते. त्याचे साहस, अन्यायाविरुद्ध गरजून उठण्याची त्याची वृत्ती आणि गरिबाविषयीचा त्याचा कनवाळूपणा या गुणांनी ते विलक्षण भारावून जात.

आपल्या भावी आयुष्यात त्यांनी अन्यायाचा प्रतिकार करण्याचे आणि गोरगरीबांचा, पददलितांचा कैवार घेण्याच जे महत्कार्य करून दाखविले, त्याची मूळ प्रेरणा त्यांना सत्याप्पा बंडखोराकडून मिळाली असावी !

भाऊरावांचे सगळे बालपण हे असे दांडगाई करण्यात आणि उनाडण्यात निघून गेले. शाळेचा त्यांना मनस्वी कंटाळा होता. चार भिंतींच्या आत कोंडून पडण्याची आणि बांधून घेण्याची त्यांना अगदी चीड येत असे. त्यामुळे कुंभोज सोडून वडिलांच्या बरोबर राहण्याचा जेव्हा प्रसंग आला तेव्हा भाऊराव बरेच अस्वस्थ झाले. त्यांनी थोडीशी आदळआपट करून पाहिली, मामाच्याच गावी राहण्याचा हट्टही धरून बघितला, पण वडिलांपुढे त्यांचे काही चालले नाही.

भाऊराव हे त्यांच्या वडिलांचे सर्वांत थोरले चिरंजीव ! तेव्हा हा मोठा मुलगाच असा उनाडण्यात आणि शिक्षण सोडून चकाट्या पिटण्यात काळ घालवू लागला, तर त्याच्या भावंडांचे तरी शिक्षण कसे होणार? असे वाटून पायगौंडा पाटलांनी भाऊरावांना आपल्या घरी आणले व शाळेत घातले. पण त्यांची नोकरीनिमित्ताने निरनिराळ्या गावी बदली होऊ लागली व त्यामुळे भाऊरावांच्या

शिक्षणाची एकसारखी आबाळच होत राहिली. वयाची सोळा वर्षे झाली, तरी त्यांची प्रगती इंग्रजी दुसरीपलीकडे काही गेली नाही.

मग पायगौंडा पाटलांनी निराळाच विचार केला. कोल्हापूरला त्यांच्या समाजाचे (जैन पंथाचे) वसतिगृह होते आणि तिथली शाळाही चांगली होती. भाऊरावांना त्यांनी कोल्हापूरला पाठवले. जैन वसतिगृहात राहायचे व शाळेत जाऊन शिकायचे. भाऊराव कोल्हापूरला गेले आणि चारसहा महिने त्यांचे शिक्षणही नीट चालले. पण पुढे एक प्रकरण उपस्थित झाले आणि त्यामुळे त्यांना जैन वसतिगृह सोडावे लागले. प्रसंग असा घडला--

'वसतिगृहातल्या कोणाही विद्यार्थ्याने स्नान करणे, केस कापणे किंवा दाढी करणे या सारख्या गोष्टी करायच्या असल्यास, त्या त्याने सकाळच्या जेवणापूर्वी कराव्या. नंतर केव्हाही केल्यास त्या शिक्षापात्र समजण्यात येतील,' असा वसतिगृहाचा नियम होता. परंतु वसतिगृहातील काही विद्यार्थ्यांना या ना त्या कारणामुळे हा नियम जाचक आणि त्रासदायक वाटू लागला. त्यांचे म्हणणे असे, की स्नान, दाढी, केशकर्तन या गोष्टी स्वच्छता करण्याच्या. आणि स्वच्छता काय, केव्हाही केली तरी चालेल. त्याला अमुकच वेळेचे बंधन कशाला? शिवाय, हा नियम केवळ विद्यार्थ्यांनाच काय म्हणून? वसतिगृहाचे संचालक आणि अन्य अधिकारी वाटेल त्या-वेळी दाढी करतात, स्नान करतात, केस कापतात, त्यांचे काय? त्यांना कोणी शिक्षा करायची?

एका अर्थी विद्यार्थ्यांची तक्रार बरोबर होती. पण ती धाडसाने संचालकासमोर मांडणार कोण? काही विद्यार्थ्यांनी या कामी भाऊराव पाटलांना पुढाकार घ्यायला सांगितले. झाले, भाऊराव म्हणजे अन्यायाविरुद्ध सदैव दंड थोपटून उभा असलेला बलभीमच!

बालपणी त्यांच्या एका महार मित्राला एका विहिरीवर तिथल्या लोकांनी पाणी प्यायला प्रतिबंध केला, तेव्हा भाऊराव सिंहासारखे चवताळले होते. त्यांनी अक्षरशः गरजून सांगितले, ‘ जर माझ्या या मित्राला तुम्ही इथे पाणी पिऊ दिले नाही तर मीही तुम्हाला या विहिरीचे पाणी काढू देणार नाही. रहाट मोडून टाकीन आणि पोहरा विहिरीत फेकून देईन. मग पाहा आपला विचार ! ’ अशी एक का दोन उदाहरणे ! कुठेही, कुणावरही अन्याय झाला की भाऊरावांनी वळविलाच आपला मोहरा तिकडे. मग त्यांचा आवेश एवढा प्रभावी, आवाज एवढा गरजणारा आणि झेप इतकी विलक्षण असे, की त्यांचे विरोधक गर्भगळित होऊन जात. या दांडगेश्वरापुढे आपले काही चालणार नाही, हे ओळखून ते तेव्हाच पोबारा करीत.

आताही तसेच झाले. भाऊरावांनी विद्यार्थ्यांची तक्रार ऐकली. त्यांना ती पटली आणि लगेच त्यांनी दंड थोपटले.

दुपारची वेळ होती. भाऊरावांनी मुद्दामच त्या अवेळी दाढी केली. कुणी तरी ही गोष्ट वसतिगृहाचे संचालक श्री. अण्णासाहेब लठ्ठे यांच्या कानावर घातली. ते रागावले आणि त्यांनी भाऊरावांना बोलावून घेऊन नियमभंग केल्याबद्दल त्यांची चांगली हजेरी घेतली. पण भाऊराव शांत राहिले. अण्णासाहेबांचे सगळे म्हणणे शांतपणे ऐकून घेतल्यावर भाऊराव त्यांना म्हणाले, ‘ तुमचे म्हणणे मी ऐकले. पण मला ते पटले नाही. नियम म्हटला, की तो विद्यार्थ्यांना वेगळा आणि शिक्षकांना आणि संचालकांना वेगळा असे करणेच चूक आहे. एकदा दुपारी दाढी करणे हा गुन्हा मानला, की मग तो विद्यार्थ्यांनी केला काय अन् संचालकांनी केला काय, तो गुन्हाच ! आणि गुन्हा केला म्हणून दंड भरायचा

तर तो केवळ विद्यार्थ्यांनीच काय म्हणून? संचालकांनीही दंड भरला पाहिजे.'

भाऊरावांचे म्हणणे अगदी बिनतोड होते सहजासहजी खोडण्या-जोगे तर मुळीच नव्हते. अण्णासाहेबांना मोठा पेच पडला. पण ते मुरब्बी होते, राजकारणी होते. त्यांनी भाऊरावांना सांगितले,

'मला जास्ती काही पांडित्य नको. तू वसतिगृहाचा नियम जाणून बुजून धाब्यावर बसविला आहेस. त्यामुळे आमच्या शिस्तीचा भंग झाला आहे. आणि शिस्तभंग करण्याच्या गुन्ह्याबद्दल दंड देणे किंवा वसतिगृहातून बाहेर पडणे, हे दोनच पर्याय आहेत. तू काय करतोस, बोल!'

'मी दंड देणार नाही आणि तुमचे नियम अन्यायकारक अस-ल्यामुळे ते मानणारही नाही.'

'मग तुला वसतिगृह सोडावे लागेल!'

'ठीक आहे, मी वसतिगृहात राहणार नाही!'

– आणि खरोखरच भाऊराव दुसरे दिवशी वसतिगृहाच्या बाहेर पडले

आता कुठे जायचे? प्रश्न मोठा बिकट होता. पण भाऊरावांना फार वेळ सचिंत राहावे लागले नाही. कोल्हापूरला तेव्हा मामा-साहेब खानविलकर नावाचे एक गृहस्थ राहात होते. ते शाहू-महाराजांचे निकटचे नातेवाईक. त्यांचे चिरंजीव बाळासाहेब हे राजवाड्यातच राहात. मामासाहेबांची इच्छा ही, की आपल्या मुलाला एखादा चांगल्या वळणाचा मित्र असावा. भाऊरावांनी वसतिगृह सोडल्याचे त्यांना ठाऊक होते, तसेच भाऊराव हे निर्मळ चारित्र्याचे आणि गुणी असल्याचेही माहीत होते. त्यामुळे त्यांनी

आपण होऊनच भाऊरावांची गाठ घेतली आणि त्यांना राजवाड्यात आणून आपल्या मुलाच्या खोलीवर राहायला सांगितले. भाऊरावांना काय, कुठे तरी राहायचे होतेच ! ते बाळासाहेबांच्या खोलीवर राहू लागले. बाळासाहेब सरदारपुत्र होते. त्यामुळे त्यांच्या घरून रोज दोन-अडीच शेर कोरे दूध येई, दुपारी उत्तम पक्वान्नाचे जेवण येई, शिवाय मधल्या वेळी आणखी काही खाण्याचे पदार्थ येत, ते निराळेच ! पण बाळासाहेबांना दुधापेक्षा चहाची सवय जास्त. त्यांच्या चहाला काय अर्धा पाऊण शेर दूध लागत असे. उरलेले दूध त्यांनी आपण होऊनच भाऊरावांना प्यायला सांगितले. भोजनाच्या पदार्थांपैकी काही पदार्थही ते आवर्जून भाऊरावांसाठी राखून ठेवत. भाऊरावांनी या सर्व अगत्याचा, सवलतींचा यथेच्छ लाभ घेतला. ते रोज पहाटे अंधाराचे उठत. घामाघूम होऊन जाई तो जोर बैठका मारीत. मग कुठेतरी जाऊन रपेट करून येत व मग बाळासाहेबांच्या दुधाच्या कासंड्या घशाखाली रिचवीत. भरपूर व्यायाम आणि तितकाच खुराक यामुळे त्यांची मूळची दणदाकट प्रकृती आणखीच टणक झाली.

शाहूमहाराजांना अशी पिळदार शरीराची आणि मर्दानी आवेशाची तालिमबाज मुले पाहिली, की पराकाष्ठेचा संतोष होई. भाऊरावांची दणकट प्रकृती पाहून ते भाऊरावांवर अगदी खूष झाले. भाऊराव जसे तालिमबाज तसेच निर्व्यसनी. एकदा ते आणि त्यांचे मित्रमंडळ रस्त्याने जात होते. समोरून शाहूमहाराजांचा खडखडा ( बैलगाडी ) येत होता. त्यांनी पाहिले तर भाऊरावाशिवाय सर्वांच्या हाती सिगारेट्स होत्या ! महाराजांना मोठे आश्चर्य वाटले. त्या दिवशी संध्याकाळी त्यांनी सर्वांना राजवाड्यावर बोलावून घेतले व सिगारेट्स ओढणाऱ्या मुलांची चांगली कडक

शब्दात हजेरी घेतली; पण त्याच वेळी त्यांनी भाऊरावांना मात्र शाबासकी दिली.

महाराजांची आपल्यावर चांगलीच मर्जी बसली आहे, हे चाणाक्ष भाऊरावांनी तेव्हाच ओळखले. पुढे ते एकदा सहावीच्या परीक्षेत नापास झाले. शिक्षक फार कडक स्वभावाचे. त्यांचे पाय धरून उपयोग नव्हताच! भाऊराव सरळ महाराजांकडे गेले आणि त्यांनी शिक्षकांना सांगून आपल्याला वरच्या वर्गात घालावे, अशी विनंती केली. महाराजांनी शिक्षकांना बोलावून घेतले व भाऊरावांना वरच्या वर्गात घालावे, असे सांगितले. पण शिक्षकांनी महाराजांना स्पष्ट शब्दात सांगितले, की "हा मुलगा अभ्यासात अगदी 'ढ' आहे. त्याला वरच्या वर्गात ढकलण्यात त्याचेच नुकसान आहे. इतकेही करून तुमची आज्ञाच असेल तर...'

"छे! छे! माझी मुळीच आज्ञा नाही. 'ढ' असेल तर राहू दे त्याला याच वर्गात!"

भाऊरावांचा अगदी नाइलाज झाला. प्रत्यक्ष महाराजांच्या वशिल्यानेही आपण वरच्या वर्गात जाऊ शकलो नाही आणि आपला अभ्यास तर मुळातच कच्चा, अशा स्थितीत आपण आता कसचे पास होणार आणि कसचे पुढे शिकणार? असे त्यांना वाटू लागले. त्यापेक्षा झाले एवढे शिक्षण पुरे, असा विचार करून त्यांनी सरळ शाळाच सोडून दिली आणि ते आपल्या घरी इस्लामपूरला परत आले.

इस्लामपूरच्या मुक्कामात एक दिवस भाऊराव तिथल्या एका शाळेत गेले. त्या शाळेच्या दारात एक मुलगा आपले पाटीदप्तर घेऊन बसला होता. त्याचे लक्ष समोरच्या वर्गातील शिक्षकांच्या

शिकवण्याकडे होते. वर्गातील बाकीची बरीच मुले शिकवण्याकडे लक्ष न देता टंगळमंगळ करीत होती. हा मुलगा मात्र एकाग्र चित्ताने शिक्षकांचे बोलणे ऐकत होता. भाऊरावांनी ते पाहिले आणि त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी त्या मुलाला वर्गात बसविण्याची त्याच्या शिक्षकांना विनंती केली; परंतु शिक्षकांनी ते साफ नाकारले. ते म्हणाले. 'अहो, हा महाराचा मुलगा. त्याला वर्गात बसविले, की बाकीच्या मुलांना त्याची शिवाशीव होणार अन् मग ती मुले शाळा सोडून गेली, की सगळी शाळा ओस पडणार!'

भाऊरावांना ते ऐकून वाईट वाटले, तसाच तीव्र संताप आला. शिक्षकांच्या वागण्याचा आणि त्याचबरोबर अस्पृश्यता पाळणाऱ्या समाजाचाही! ते त्या मुलाजवळ गेले आणि म्हणाले,

"चल रे बाळ, माझ्याबरोबर. या असल्या दुष्ट रीती-रूढी पाळणाऱ्या शाळेत नको राहू. मी तुझ्या शिक्षणाची चांगली व्यवस्था करतो!'

–आणि भाऊराव त्या मुलाला घेऊन तिथून बाहेर पडले. पुढे त्यांनी त्याला कोल्हापूरच्या मिस् क्लार्क हॉस्टेलमध्ये ठेवले व तिथेच मॅट्रिकपर्यंत शिकवले.

या मुलाचे नाव ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप. केवळ अस्पृश्य जातीत जन्म घेतल्यामुळे त्याला ज्ञानापासून दूर राहावे लागत होते, वंचित व्हावे लागत होते. भाऊरावांनी या ज्ञानदेवाला आकंठ ज्ञानामृत पाजून आपल्या भावी कार्यकर्तृत्वाचा पाया घातला. पहिल्या दिवशी तर भाऊरावांनी त्याला आपल्या घरी जेवायला देखील घातले होते. अगोदर भाऊरावांच्या मातुश्रींना काहीच पत्ता नव्हता; पण संध्याकाळी त्यांना सारे काही समजले. दुपारी

आपल्या घरी जेवलेला मुलगा महाराचा होता, असे कळल्यावर त्यांचा अगदी जळफळाट झाला. संतापून त्यांनी जवळची फुंकणी उचलली आणि भाऊरावांच्या पाठीत घातली. बरोबर चार शिव्याही हासडल्या. भाऊरावांनी तो मार अन् शिव्या सुखाने शिरी झेलल्या. कारण त्यांनी अस्पृश्यतेचे, भेदाभेदाचे आणि शिवाशिवीचे बंडच मोडून काढायचे व्रत स्वीकारले होते. समाजातल्या सर्व लहान-थोरांना सुशिक्षित अन् सुसंस्कृत करायची प्रतिज्ञा केली होती. त्यासाठी कितीही कष्ट, कितीही संकटे झेलायची त्यांची सिद्धता होती.

स्वतःचे शिक्षण अर्धवट झाले होते, आता पुढे काय करायचे, असा प्रश्न भाऊरावांपुढे होता. समाजसेवा करायची, सर्व जातींच्या आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना शिक्षण द्यायचे, जातिभेद मोडायचे—हे सारे संकल्प होते; पण, त्यांच्या पूर्वतयारीसाठी काही काळ जाणे आवश्यक होते. त्यासाठी निदान स्वतःचे पोट भागेल, एवढे तरी अर्थार्जन करणे जरूर होते. भाऊरावांनी मग नोकरीच्या शोधासाठी खटपट सुरू केली.

प्रथम त्यांनी पोलिसात जायचे ठरवले; पण वडिलांनी त्यांचा तो बेत मोडून काढला. मग त्यांनी घरच्या शेतीकडेच काही दिवस लक्ष दिले. याच काळात म्हणजे इ. स. १९१० सालच्या सुमारास म्हैसूरला जैन महासभेचे अधिवेशन भरले. भाऊरावांनी त्या अधिवेशनासाठी एक स्वयंसेवक पथक उभारले. या पथकाने केलेली चोख व्यवस्था पाहून अधिवेशनाचे अध्यक्ष शेठ माणिकचंद पानाचंद हे फार प्रसन्न झाले व त्यांनी भाऊरावांना आपल्या मुंबईच्या पेढीवर काम करण्यासंबंधी विचारले. भाऊरावांनी होकार दिला, काही दिवस मुंबईच्या पेढीवर कामही केले; पण पुढे तिथले

काम त्यांना न आवडल्यामुळे त्यांनी ते सोडून दिले व ते सातारला आपल्या घरी परतले.

सातारला त्यांनी खाजगी शिकवण्यांचे वर्ग सुरू केले. वर्गातल्या विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच पुस्तके, वह्या आणि कपडेही पुरविण्याची जबाबदारी त्यांनी पत्करली होती. तळमळीने आणि कळकळीने शिकवण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे अल्पावधीतच त्यांचे विद्यार्थी परीक्षेतून प्रथम क्रमांकांनी उत्तीर्ण होऊ लागले.

विद्यार्थ्यांच्या या यशकीर्तीचा सुगंध जसजसा दूरवर दरवळू लागला, तसतशा भाऊरावांना आणखी शिकवण्या मिळू लागल्या. प्रतिमासी शंभर-सव्वाशे रुपये ते लीलया मिळवू लागले.

भल्या पहाटे उठायचे, भराभरा शौच-मुखमार्जन-स्नानादी प्रातरान्हिके आटोपायची, थोडी न्याहारी करायची आणि घरोघरच्या शिकवण्यांसाठी बाहेर पडायचे. सबंध दिवसभर त्यांचा हा ज्ञानदानाचा यज्ञ अखंडपणे चालू असे. गणित, इतिहास, भूगोल, संस्कृत–सर्व विषय ते समर्थपणे शिकवीत. खरे तर गणित आणि संस्कृत हे विषय भाऊरावांचे अगदी कच्चे! शाळेत तर ते या विषयात हमखास नापास व्हायचे! पण जेव्हा त्यांनी शिक्षकाचाच पेशा पत्करला, तेव्हा या विषयांशी त्यांनी अशी काही झुंज घेतली, की त्यात त्यांनी चांगलेच प्राविण्य संपादिले. आपल्या विद्यार्थ्यांचे कशाकशात अडू द्यायचे नाही व त्यांना 'शहाणे करून सोडावे । सर्व विषयी' हे भाऊरावांचे ब्रीद होते. याच काळात त्यांनी साताऱ्च्या युरोपियन कलेक्टरला मराठी भाषा शिकवण्याचेही काम केले.

अशा प्रकारे शिकवण्यांचा धुमधडाका चालू असता भाऊराव आणखीही अनेक व्यवसायात भाग घेत. साताऱ्च्या कृषी सुधारणा

मंडळाची शेअरविक्री व प्रचार, लाहोरच्या भारत इन्शुअरन्स कंपनीची विमा एजन्सी, इत्यादी कामे त्यापैकीच होत. पण यातल्या कोणत्याच कामात भाऊरावांचे मन रमले नाही. या निमित्ताने केलेल्या प्रवासात त्यांना देशभरची समाजस्थिती मात्र बारकाईने पाहता आली व त्यावरून त्यांच्या मनाचा पक्का निश्चय झाला, की आपल्या देशाची दु:स्थिती सुधारण्याचा एकमात्र उपाय शिक्षण हाच आहे आणि आपण यापुढे त्या शिक्षणकार्यालाच वाहून घेतले पाहिजे.

भाऊरावांच्या मनात असे विचार घोळत असतानाच इ.स. १९११ सालच्या सुमारास त्यांचा दूधगावच्या भाऊसाहेब कुदळे व मध्वण्णा मास्तर या समाजसेवकांशी संबंध आला व त्या उभयतांच्या संमतीने त्यांनी दुधगाव येथे एक शिक्षणसंस्था स्थापन केली. थोड्याच दिवसात तिथे विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृहही चालू करण्यात आले. जातपात न पाहता कोणाही विद्यार्थ्याला तिथे राहता येत असे. दूधगावच्या पाठोपाठ नेर्ले या गावीही असेच एक वसतिगृह काढण्यात आले. हे प्रयोग यशस्वी झाल्यावर इ.स. १९१९ साली काले या कऱ्हाड तालुक्यातल्या एका छोट्या गावी भाऊरावांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. इथेही वसतिगृह होतेच. भाऊरावांच्या या रयत शिक्षण संस्थेने पुढे अवघा महाराष्ट्र व्यापून टाकला. या संस्थेची पाळेमुळे खेडोपाडी रुजून लक्षावधी दलित बांधव सुशिक्षित व सुसंस्कारित बनले. या ना त्या प्रकारे ज्याचे स्वत:चेच शिक्षण अपूर्ण राहिले त्या अर्ध-शिक्षिताने उभ्या महाराष्ट्राला सुशिक्षित करावे, ही एक अद्भुत अन् आश्चर्यकारक किमयाच होती !

भाऊरावांनी मोठ्या उमेदीने आपले शिक्षणसंस्था स्थाप-

ण्याचे, त्या वाढविण्याचे आणि अहोरात्र त्यासाठी तन-मन-धन अर्पण करून त्या सर्वार्थाने यशस्वी करून दाखविण्याचे प्रयत्न सुरु करायला आणि त्यांच्या जीवनावर एका महान संकटाचे सावट यायला एक गाठ पडली. प्रारंभी सांगितलेले राणीच्या पुतळ्याला डांबर फासले गेल्याचे प्रकरण व त्यात भाऊरावांना अकारण गोवण्याचे प्रकार श्री. निटवे यांचे प्रयत्न, हेच ते संकट होय. पण संकटे कोसळावी अन् भाऊरावांनी आपल्या धीम्या आणि धीरोदात्त वर्तनाने ती परतवावी, हा एक त्यांच्या जीवनातला नित्यनियम होता. याही प्रसंगी तेच झाले. भाऊरावांनी शेवटपर्यंत आपली सत्यनिष्ठा सोडली नाही आणि शेवटी त्यांची निर्दोष म्हणून सुटका झाली. मात्र या काळात त्यांना शारीरिक आणि मानसिक असा दुहेरी त्रास सहन करावा लागला; पण ते हालाहल त्यांनी लीलया पचविले.

तुरुंगातून सुटल्यावर काही काळ भाऊरावांनी किर्लोस्कर आणि कूपर या कारखान्यांचे लोखंडी नांगर खपविण्याचेही काम केले; पण मागील नोकऱ्याप्रमाणे याही नोकरीत त्यांचे मन रमले नाही व मग ते पुनश्च आपल्या शिक्षणकार्याकडे वळले.

एवढ्यात म. गांधींच्या नेतृत्वाखाली इ.स. १९२०-२१सालचा असहकारितेचा लढा चालू झाला. भाऊरावांना राजकारणाचे विशेष आकर्षण नव्हते; पण म. गांधींना पाहण्याची व त्यांचे भाषण ऐकण्याची मात्र त्यांना जिज्ञासा होती. त्यामुळे म. गांधी मुंबईला येत आहेत व तिथे त्यांचे भाषण होणार आहे, असे कळताच भाऊराव तिथे अक्षरशः धावून गेले आणि तिथून परतले ते गांधींच्या विलक्षण व्यक्तिमत्वाने भारावून ! म. गांधींचा साधा पोशाख, त्यांचे शालीन आणि विनम्र वागणे–बोलणे व राष्ट्र-

कार्याविषयीची अमाप तळमळ यांचा त्यांच्या श्रद्धाशील मनावर फार परिणाम झाला. मुंबईला ते गेले तेव्हा मोठ्या रुबाबदार पोशाखात गेले, पण तिथून ते परतले ते मात्र आपादमस्तक खादी आणि स्वदेशी कपड्यात! म. गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा किती उत्कट प्रभाव त्यांच्यावर पडला होता, त्याचे ते द्योतक होते.

यानंतर इ. स. १९२४ साली भाऊरावांनी सातारा येथे रयत शिक्षण संस्थेची नवी शाखा उभारली. इथल्या संस्थेची स्थापना एका अस्पृश्य विद्यार्थ्याच्या हस्ते झाली. त्या दिवशी दसरा होता. समाजक्रांतीचे एक नवे रणशिंग भाऊरावांनी फुंकले होते! या संस्थेच्या वसतिगृहात अस्पृश्य विद्यार्थ्यांना अत्यंत सन्मानपूर्वक वागविले जाई. कोणावरही थोडासुद्धा अन्याय होऊ दिला जात नसे. प्रारंभापासूनच असे वातावरण ठेवल्यामुळे त्या विद्यार्थ्यांना ही संस्था आपलीशी वाटायला लागली. वर्षानुवर्षे त्यांना साऱ्या सुखसमृद्धीचे मार्ग बंद होते. भाऊरावांनी त्यांना शिक्षणाचा दरवाजा खुला करून दिला. त्यामुळे एका जिद्दीने व उमेदीने सर्व अस्पृश्य समाज प्रगतीच्या दिशेने भरधाव आगेकूच करू लागला.

पूर्वीच्या काळी राजे लोक दिग्विजय करीत. आपल्या अतुल पराक्रमाने आणि शौर्याने शत्रूच्या प्रदेशावर हल्ला चढवायचा, तो प्रदेश जिंकून घ्यायचा, तिथे आपला एखादा सरदार ठेवून त्याची नीट व्यवस्था लावायची, की पुढचा प्रदेश जिंकायला निघायचे व अशा प्रकारे सर्व दिशांना आपले स्वामित्व प्रस्थापित करायचे अशी त्यांची पद्धती असे. भाऊरावांनीही एक नव्या पद्धतीचा असा हा दिग्विजयच आरंभिला होता. एक गाव निवडायचे, तिथे रयत शिक्षण संस्थेची शाखा काढायची, जोडीला वसतिगृह उभारायचे–ती शिक्षणसंस्था व ते वसतिगृह व्यवस्थित चालू झाले

की पुढच्या गावी पुन्हा तोच प्रयोग! असे करता करता त्यांनी सर्व महाराष्ट्रभर आपल्या संस्थेच्या शाखांचे जाळे विणले. त्यामुळे ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्व जातींचे व सर्व थरातले विद्यार्थी एकत्र राहून शिक्षण घेऊ लागले. कोणा एखाद्याने ' मी शिकणार नाही, ' अशी प्रतिज्ञा केली, तरी त्याला ती पाळता येऊ नये व त्याने आपण होऊन शिकायला यावे, एवढे सामर्थ्य भाऊरावांच्या या कार्याने खेडोपाडी निर्माण झाले.

अर्थात हे सारे एकाएकी झाले नाही. अक्षरश: कणन्कण जमवून आणि क्षणन्क्षण जाळून भाऊरावांनी या कार्याची उभारणी केली. अगोदर जातिभेद मोडण्याचा, अस्पृश्यता नाहीशी करण्याचा आणि स्त्री-पुरुष-शूद्रादी साऱ्यांना शिकवून शहाणे करण्याचा हा विचारच मोठा दिव्य आणि दाहक होता. शतकानुशतके ब्राह्मणादी उच्चवर्णीयांचे दास्यत्व करीत आलेल्या लोकांना पाटी–पुस्तक घेऊन शिकण्याचा, स्वच्छ राहण्याचा, चांगले शुद्ध बोलण्याचा आणि चांगले खाण्याचा मनस्वी कंटाळा होता. त्यामुळे भाऊरावांना या समाजाला कधी समजुतीने, कधी धाकदपटशाने तर कधी अत्यंत कठोर भाषा वापरूनही शाळेकडे खेचावे लागे व तिथेच टिकवून धरावे लागे. उलट ब्राह्मणादी उच्च जातीचे लोक या खालच्या जातींनी शिकू नये, असेच अज्ञानी व मूर्ख राहावे, अशा प्रयत्नात असत. त्यामुळे भाऊरावांना त्यांच्याशीही दोन हात करावे लागत.

शिवाय संस्था चालवायची म्हणजे जागा हवी, इमारत हवी, पाटी-पुस्तकासाठी आणि वसतिगृहातल्या विद्यार्थ्यांच्या जेवणाखाण्यासाठी, कपड्यालत्त्यासाठी पैसे हवे–एक की दोन–हजारो गरजा ! त्या कशा पुऱ्या करायच्या मग त्यासाठी धनवंतांची–

श्रीमंतांची आर्जवे आली. आणि आर्जवे केली, की लगेच पैसे थोडेच मिळतात ? अनेक वेळा नुसती आश्वासने व प्रलोभनेच पदरात पडत. पण रुसायचे नाही हसायचे, थकायचे नाही काम करीत राहायचे, हा भाऊरावांचा स्वभावविशेष असल्यामुळे कोणत्याही कठिण प्रसंगातून ते पार होत.

असाच एक प्रसंग. कसोटी पाहणारा. भाऊरावांच्या संस्थेतला एक मुलगा अतिशय आजारी पडला. भाऊराव कुठे तरी गावाला गेलेले. घरी त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई एकट्या. पण भाऊरावांच्या अनुपस्थितीत त्या संस्थेतल्या विद्यार्थ्यांची आईसारखी काळजी घेत. त्या दिवशी त्या आजारी मुलाच्या उशाशी त्याची शुश्रूषा करीत लक्ष्मीबाई एकसारख्या बसून राहिल्या. त्याच वेळी त्यांची आई आजारी असल्याची तार आली. पण लक्ष्मीबाई जागच्या हालल्या नाहीत. 'माझा मुलगा आहे, त्याला बरे वाटले, की लगेच येते,' अशा मजकुराची उलट तार करून त्या तिथेच बसून राहिल्या !

एकदा भाऊराव असेच बाहेरगावी गेले. वसतिगृहात धान्याचा कण नव्हता आणि दिवस सणाचा होता. एक नव्हे-दोन नव्हे–पंचावन्न मुले जेवायची ! जवळ पैसा नाही. लक्ष्मीबाईंनी आपल्या गळ्यातले तीन तोळ्यांचे डोरले काढले आणि ते गहाण ठेवून मुलांना जेवू घातले. सण साजरा केला !

असे किती प्रसंग सांगावे ? असंख्य अडचणी, असंख्य उपाय. भाऊरावांची वाटचाल चालू होती. शेवटी शरीर थकत चालले. प्रवास होईना. हात-पाय विश्रांतीची वाट पाहू लागले. वय सत्तरी ओलांडून गेले. भाऊराव आता दमले. अंथरुणाला खिळले. मान-सन्मानाच्या पदव्या, हारतुरे त्यांच्या पायाशी चालून आले. पण

त्यांना आता कशातच रस नव्हता. त्यांच्या डोळ्यापुढे आता पैलतीर उभे होते. आणि ९ मे १९५९ या दिवशी भाऊरावांनी अखेर ते पैलतीर गाठलेच !

पांढऱ्या शुभ्र दाढी-मिशांनी शोभिवंत झालेली, हसऱ्या चेहऱ्याची, मिष्किल डोळ्यांची, पहाडासारख्या कणखर अन् मजबूत बांध्याची, घनगंभीर आवाजाची आणि समाजोद्धारासाठी तिळ-तिळ झिजणारी त्यांची तेजस्वी तपोमूर्ती त्या दिवशी पंचत्वात विलीन झाली. भाऊराव गेले; पण त्यांचे कार्य सदैव चिरस्मरणीय आहे, अजरामर आहे.

# राजर्षी शाहू छत्रपती

कोल्हापूरजवळ कागल नावाचे एक गाव आहे. जयसिंगराव घाटगे हे तिथले जहागीरदार. आबासाहेब घाटगे या नावाने ते ओळखले जात. धिप्पाड उंचेपुरे शरीर–एखाद्या बुरुजासारखे. त्या शरीराला साजेसाच गडगडता आवाज. ओठावर कल्लेदार मिशा. विशाल भालप्रदेश, रुबाबदार देखणे व्यक्तिमत्व. स्वभाव करारी आणि निर्धारी. बोलणे–वागणे मोजके, माफक आणि चोख.

त्यांची पत्नी राधाबाई. त्याही नवऱ्यासारख्याच सुशील आणि कर्तव्यतत्पर. मनमिळाऊ स्वभावाच्या. श्रद्धाशील वागणुकीच्या.

अशा या पुण्यशील दांपत्याच्या पोटी दि. २६ जुलै १८७४ साली एक मुलगा जन्मला. त्याचे नाव ठेवले यशवंतराव. तोही वडिलांसारखाच बलदंड शरीराचा. कृष्णवर्ण, भेदक डोळे. अबोल पण दिलदार. मग त्याला आणखी एक भाऊ झाला. त्याचे नाव पिराजीराव किंवा बापूसाहेब. ही मुले जन्मली थोडी मोठी झाली.



मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे. ग्रन्थालय शाखा.
अनुक्रम ........ वि ........
क्रमांक ........ नोंद दि. ........


तेवढ्यात दुर्दैवाचा फेरा आला आणि राधाबाई मरण पावल्या. दोन्ही मुले पोरकी झाली. आता त्यांचा सांभाळ कोण करणार? यशवंता तीन वर्षांचा आणि पिराजी तर त्याहून लहान. कुणातरी बाई-माणसाशिवाय त्यांचे पालनपोषण शक्यच नव्हते. आबासाहेबांनी सगळा विचार करून दुसरे लग्न केले. ही नवी पत्नी पायगुणाची ठरली. ऑक्टोबर महिन्यात ते कागलचे मुखत्यार झाले. मुखत्यार म्हणजे मुख्य कारभारी. आबासाहेबांना आता नवा हुरुप आला. त्यांनी आपल्या संस्थानात सुधारणांची घोडदौड सुरू केली.

प्रथम ते सर्व संस्थानात फिरले. लोकांच्या अडीअडचणी आणि तक्रारी त्यांनी ऐकल्या–समजावून घेतल्या. कचेरीत ते ठराविक वेळी येत–ठराविक वेळी जात. मधल्या काळात वादग्रस्त प्रश्नांचे निर्लेप मनाने निर्णय देत. कोणाचीही भीडमुर्वत बाळगायची नाही हा त्यांचा बाणा. त्यामुळे लौकरच त्यांचा सर्वत्र दबदबा व दरारा निर्माण झाला. त्यांच्या हाताखालचे सर्व लोक कर्तव्यदक्ष बनले. आपापली कामे चोखपणे बजावू लागले.

मग आबासाहेबांनी खेडोपाडी मुलामुलींसाठी शाळा काढल्या. यात्रेकरूंसाठी धर्मशाळा बांधल्या. न्यायनिवाड्यासाठी चावड्या बांधल्या. पाण्यासाठी विहिरी–तळी खोदली. व्यायामासाठी तालमी-आखाडे उभारले. एवढेच काय पण कागल संस्थानसाठी छोटासा राजवाडादेखील उभारला.

आबासाहेब प्रवासाचेही विशेष नादी होते. कागलचा कारभार करताकरताच त्यांनी सबंध भारताचा प्रवास केला व ठिकठिकाणच्या चांगल्या गोष्टी, चांगल्या योजना यांचा आपल्या संस्थानात त्यांनी वापर करून घेतला.

अल्पावधीत त्यांनी केलेला हा कागलचा कायापालट पाहून मुबईचा तत्कालीन गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन हा त्यांच्यावर अत्यंत खूष झाला व त्याने इ. स. १८८२ च्या मार्च महिन्यात कोल्हापूरचे रीजंट म्हणून आबासाहेबांची नेमणूक केली.

कागलप्रमाणेच कोल्हापूर येथेही आबासाहेबांनी थोड्याच दिवसात अनेक सुधारणा केल्या व राज्यकारभाराला व्यवस्थित स्वरूप आणले. त्यांच्या कर्तबगारीचा इंग्रज सरकारने मोठा बहुमान केला. त्यांना नऊ तोफांच्या सलामीचा मान बहाल करण्यात आला. इतकेच नव्हे, तर त्यांचा मुलगा यशवंतराव यास कोल्हापूरच्या गादीवर बसवण्याचेही इंग्रज सरकारने घोषित करून टाकले.

दि. १७ मार्च १८८४ या दिवशी यशवंतरावांचे रीतसर दत्तकविधान झाले. कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजीमहाराज यांना मूलबाळ नव्हते. त्यामुळे त्यांच्यानंतर कोल्हापूरच्या गादीला वारसच उरला नाही. म्हणून मग त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी इंग्रज सरकारच्या संमतीने दत्तक घ्यायचे ठरवून, त्याप्रमाणे आबासाहेब घाटगे यांच्या मुलाला–यशवंतरावाला–दत्तक घेतले. यावेळी त्याचे वय अवघे दहा वर्षांचे होते. दत्तकविधानानंतर त्याचे नाव शाहुमहाराज ठेवण्यात आले.

यानंतर शाहूमहाराजांना राजकोटच्या एका खास शिक्षणसंस्थेत शिकायला पाठविण्यात आले. त्यांच्याबरोबर त्यांचे धाकटे बंधू व आणखीही दोन सरदारपुत्र ठेवण्यात आले. आबासाहेब कोल्हापूरला व मुले राजकोटला. तथापि इतक्या दुरूनही ते आपल्या मुलांची व त्यांच्या सवंगड्यांची काळजी घेत. अशी ४–६ वर्षे गेली आणि मग आबासाहेबांची प्रकृती अचानकपणे बिघ-

डली व त्या दुःखण्यातच दि. २० मार्च १९०५ या दिवशी ते मरण पावले. त्यांच्या निधनाची वार्ता तत्काळ राजकोटला कळविण्यात आली. परंतु राजकोट ते कोल्हापूर हा प्रवास फार अंतराचा. तशात वाहने म्हणजे फक्त टांगे आणि घोडे. त्यामुळे मुलांना वडिलांच्या अंत्यदर्शनाला येता आले नाही.

पुढे दोन दिवसांनी मुले आली व वडिलांची मरणोत्तर कार्ये करून राजकोटला परत गेली. शाहूमहाराजांना वडिलांच्या निधनाचे दुःख फार जाणवले. त्यांचे अन्न, झोप, बोलणे–सर्व काही तुटले. मग त्यांच्या गुरुजींनी त्यांना गुजराथ–काठेवाडातील शिल्पसौंदर्य व प्रेक्षणीय स्थळे दाखवायला नेले. त्यामुळे त्यांच्या मनाला थोडा अल्हाद वाटला व त्यांची मनःस्थिती पूर्ववत झाली.

जवळ जवळ साडेतीन–चार वर्षे महाराज राजकोटला होते. या अवधीत त्यांनी कुस्ती, शिकार व शालेय शिक्षण यात प्रावीण्य संपादन केले. अश्वारोहणातही ते तरबेज झाले. राजकोटच्या मुक्कामाचे दिवस एकंदरीत चांगले गेले असले, तरी तिथली हवा शाहूमहाराजांना मानवली नाही. त्यांना ताप येऊ लागला व शेवटी हवापालटासाठी महाबळेश्वरला जाऊन आल्यावर पुन्हा राजकोटला जाण्याचेच त्यांनी नाकारले. मग श्री. फरेझर या नव्या शिक्षकाच्या हाताखाली धारवाड येथे त्यांना शिक्षणासाठी पाठविण्यात आले. धारवाडचा चार वर्षांचा काळ महाराजांना अत्यंत सुखद व आनंदप्रद वाटला. सकाळी सहा वाजता उठल्यापासून रात्री नऊ–साडेनऊ वाजता निजेपर्यंत सर्व वेळ अभ्यास, तालीम, खेळ यासारख्या जीवनोपयोगी उद्योगात निघून जात असे. त्यामुळे महाराजांची मनःस्थिती प्रसन्न राहिली, त्यांचे वजन वाढले व ताकदही वाढली. प्रारंभापासूनच त्यांना युरोपियन रीतीरिवाज,

युरोपियन खेळ, युरोपियन शिक्षणपद्धती व युरोपियन लोक यांचा मनस्वी तिटकारा असे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकरी समाजात वावरताना, त्यांची बोली बोलताना, त्यांची चटणीभाकरी खाताना ते विशेष खूष असत.

धारवाडचे शिक्षण संपल्यावर महाराजांनी काही दिवस हिंदुस्थानातल्या मोठमोठ्या शहरांचे दौरे करण्यात घालवले. या प्रवासामुळे त्यांना समाजनिरीक्षण करता आले, तसेच त्यांच्या अंगी व्यवहार चातुर्यही आले. हिंदू देवस्थानातून चालणारा पुजारीवर्गाचा लुटारूपणा पाहून त्यांना जशी चीड आली, तसेच शीखांची व मुसलमानांची देवालये पाहताना तिथल्या शांतता-पावित्र्यादी गुणांनी ते प्रसन्न झाले.

या दौऱ्यावरून परत येताच त्यांचा विवाह करून घेण्यात आला. बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांची मुलगी लक्ष्मीबाई ही शाहूमहाराजांची पत्नी झाली. दि. १ एप्रिल १८९१ या दिवशी म्हणजे वयाच्या सतराव्या वर्षी शाहूमहाराज बडोदे मुक्कामी चतुर्भुज झाले.

लग्नानंतर पुन्हा सबंध हिंदुस्थानभर महाराजांनी दौरा काढला याही वेळी त्यांनी बारकाईने समाजनिरीक्षण केले. जागोजाग आढळणारा गरीब श्रीमंत, लहान-मोठा, स्पृश्य-अस्पृश्य यांचा भेदभाव पाहून त्यांना विषाद वाटला. सर्वत्र चालणारी उच्चवर्णीयांची मुजोरी-शिरजोरी पाहून ते संतप्त झाले. देशात बहुसंख्य लोक अज्ञान, दैन्य, दास्य, दारिद्र्य इत्यादी भीषण संकटांनी त्रस्त आहेत, हे पाहून त्यांना समाजाची करुणा आली आणि आपण ज्या संस्थानचे राजे आहो, जिथली सत्ता आपल्या हाती लौकरच येणार आहे, तिथे यातले काही उरू द्यायचे नाही, असा त्यांनी निश्चय

करून टाकला. आपल्या राज्यात समता, बंधुता, आनंद, सुख, स्वास्थ यांचे नंदनवन फुलविण्यासाठी त्यांनी शिक्षणाच्या पाणपोया उघडण्याचे ठरविले, न्यायदानाची चोख व्यवस्था ठेवण्याचे निश्चित केले व शेतकरी-कामकरी लोकांच्या घरात समृद्धी-सुबत्ता नांदावी यासाठी त्यांना सर्व प्रकारचे साहाय्य करण्याच्या योजना आखल्या. व्यसनीपणा आणि विलासीपणा यांचा त्याग करून सर्व वेळ समाजसेवा करण्याचा त्यांनी चंग बांधला.

इ. स. १८९३ साली शाहूमहाराजांनी आपल्या राज्यात दौरा काढला व आपल्या प्रजाजनांच्या अडचणी समजावून घेतल्या. आपल्या या नव्या व उमद्या राजाचे स्वागत करताना प्रजाजनांना आनंदाचे भरते आले व त्यांच्या भोळ्या-भाबड्या आदरसत्काराचा स्वीकार करताना शाहूराजांचेही हृदय भरून आले.

दि. २ एप्रिल १८९४ या दिवशी शाहूमहाराजांनी आपली राजवस्त्रे धारण करून राज्यकारभाराला प्रारंभ केला.

सुरवातीलाच त्यांनी समाजसुधारणेच्या आपल्या अभिनव योजना सहकाऱ्यांना निवेदन केल्या व त्यांच्या अम्मलबजावणीसाठी नव्या माणसांच्या नेमणुका करायला आरंभ केला. शाहूराजांचे हे नवे विचार व नवी कार्यपद्धती पाहून युरोपियन पोलिटिकल एजंट, त्यांचे अन्य सगेसोयरे, संस्थानी खात्यात वर्षानुवर्षे काही काम न करता नुसतेच ऐदीपणाने चरत राहणारे अधिकारी या सर्वांची धाबी दणाणली. त्यातल्या काहींनी महाराजांना विरोध करायचा, त्यांच्यावर इंग्रजी अधिकाऱ्यांकरवी दबाव आणायचा प्रयत्न करून पाहिला; पण महाराजांच्या कणखर आणि परखड भूमिकेपुढे त्यांचे काही चालले नाही. त्यामुळे काही विरोधक पळाले,

काही नरम आले तर काहींनी अन्य कारस्थाने करायला सुरुवात केली.

थोड्याच दिवसात महाराजांनी एका सल्लागार मंडळाची स्थापना केली व त्या मंडळाच्या वतीने ते आपल्या योजनांना मूर्त स्वरूप देऊ लागले.

न्यायदानाची बरीच कामे अडून पडली होती, ती महाराजांनी स्वत: लक्ष घालून मार्गस्थ केली. भिकारी, महारोगी यांच्यासाठी वेगळी वसाहत स्थापन केली. कैद्यांची पाहणी करून त्यांच्या अडचणी निवारल्या. काही गावात पाण्याची सोय नव्हती, तिथे विहिरी खोदल्या. खेड्यापाड्यात शाळा सुरू करून सर्व जातीच्या लोकांना एकत्र शिक्षण मिळण्याची व्यवस्था केली. वेठ-बिगारीची पद्धत कायद्याने बंद केली. व्यापारासाठी शाहुपुरी ही नवीन व्यापारी पेठच निर्माण केली. इ. स. १८९४ व १८९५ या दोन वर्षी पुण्याला भेट देऊन डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे फर्ग्युसन महाविद्यालय चालू करण्यासाठी मोठी आर्थिक मदत दिली. इ.स.१८९६ साली कोल्हापूर येथे सर्व जाती-जमातीस खुला व अल्प फी घेऊन औषध देणारा एक दवाखाना महाराजांनी काढला व त्याच्या आगेमागेच वेदांचे शिक्षण देणारे विद्यालयही सुरू केले.

पुढची दोन-चार वर्षे ग्रंथीज्वर (प्लेग), दुष्काळ इ. आपत्तींनी सबंध महाराष्ट्रच गांजून गेला. कोल्हापूर संस्थानही त्यातून सुटले नाही. मात्र शाहूमहाराजांनी या संकटकाळी आपल्या प्रजाजनांना अनेक प्रकारे दिलासा दिला. दवाखाने काढले, नवे डॉक्टर्स नेमले, शहरसफाई आरंभली, दुष्काळी कामे काढली—एक का दोन, नाना उपायांनी आपल्या प्रजाजनांचे या प्रसंगी त्यांनी रक्षण केले—पोषण केले.

महाराज असे लोकसेवेत मग्न असताना त्यांच्या व्यक्तिगत जीवनातही एकापेक्षा एक आनंदाच्या घटना घडत होत्या. दि. १० मार्च १८९४ या दिवशी त्यांना कन्यारत्नाची प्राप्ती झाली. पाठोपाठ १८९७ व १८९९ या दोन वर्षी दोन मुले जन्मली. अलिकडे बऱ्याच काळात कोल्हापूरच्या गादीवर औरस वारस येण्याचा योग येत नव्हता. महाराजांना मुले झाल्यामुळे ती चिंता नाहीशी झाली. सर्वत्र आनंदाचे साम्राज्य पसरले.

याच वर्षी शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव सुरू करायला प्रारंभ झाला. शाहूमहाराजांनीही त्यात अतिशय आदराने, उत्साहाने व भक्तीने भाग घेतला.

मग महाराजांनी आपल्या राज्यातील जातीभेद, अज्ञान, दारिद्र्य, इ. दोषांवर उपाययोजना करण्याचे कार्य आरंभले. त्यांनी संस्थानी नोकरीत मागासलेल्या वर्गांना प्राधान्य द्यायला सुरुवात केली. त्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी आणखी शिक्षणसंस्था काढल्या. निरनिराळ्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे काढली. पूल बांधणे, तलाव खोदणे, रस्ते तयार करणे, इ. कामे काढून सर्व लोकांना उद्योगी बनविले. त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था केली. प्रत्येक जातीचे स्वतंत्र वसतिगृह व स्वतंत्र शाळा निघाल्यामुळे त्या त्या जातीला आपण इतरांच्या पुढे गेले पाहिजे, अशी ईर्षा उत्पन्न झाली.

अर्थात यामुळे वर्षानुवर्षे सर्वच बाबतीत अप्रगत राहिलेला समाज जाणता, सुशिक्षित व आत्मविश्वासाने प्रस्फुरित होऊ लागला, पुढारलेल्या वर्गाचे वर्चस्व तो मानीना, विविध प्रकारे पुढारलेल्या वर्गाच्या मुजोरीला पायबंद घालण्याचा प्रयत्न तो करू लागला, तसे संघर्षाचे वातावरण निर्माण झाले. एका बाजूला सारे ब्राह्मण किंवा तत्सम उच्चवर्णीय आणि दुसऱ्या बाजूला नवशिक्षित

व अस्मिता जागृत झालेला सरसकट समाज असे दोन तट पडले. उच्चवर्णीय मंडळींना या संघर्षाला कारण असणारे शाहूमहाराज आपले वैरी वाटू लागले व त्यामुळे त्या वर्गाकडून शाहूमहाराजांच्यावर टीकेचा वर्षाव सुरू झाला. शाहूमहाराजांना या सर्व गोष्टींची पूर्व कल्पना होतीच! तेही काही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्यांना सरळ सरळ सामाजिक समता प्रस्थापित करायची होती. तीच त्यांची प्रतिज्ञा होती. संघर्षाला ते भीत नव्हते; पण शक्यतो समझोत्याने, सलोख्याने प्रश्न सुटावे व वातावरण निर्मळ, नितळ राहावे, ही त्यांची इच्छा होती. त्यासाठीच त्यांनी पहिले वसतिगृह सुरू केले, ते ब्राह्मण विद्यार्थ्यांसाठी. अन्य जाती-जमातीप्रमाणेच ब्राह्मणवर्ग हाही आपल्या समाजाचा एक आवश्यक घटक आहे, हे त्यांना निश्चितपणे मान्य होते; परंतु त्या वर्गाने आपल्या स्वार्थासाठी अन्य जाती-जमातींची प्रगती रोखून धरावी; त्यांना दैन्य व दारिद्र्य यात खितपत ठेवावे; ही गोष्ट मात्र त्यांना पूर्णपणे अमान्य होती. त्यांची कल्पना हा पुढारलेला वर्ग आपला समता प्रस्थापनेचा उद्देश समजावून घेईल व आपल्याला सहकार्य देईल, अशी होती. परंतु ती कल्पना फोल ठरून पुढारलेल्या वर्गाने आपल्याला शत्रूस्थानी बसविलेले पाहिल्यावर ते खवळले आणि दंड थोपटून आखाड्यात उतरले.

याच वेळी आर्यसमाजाने कोल्हापुरात जोर धरला. मूर्तिपूजा, जातीभेद, स्पर्शास्पर्श, स्मृतींचे प्रामाण्य, इ. समाजविघातक रूढीवर आर्यसमाजाने कठोर टीकास्त्र चालविले. त्यामुळे ब्राह्मण समाजाच्या मुळावरच घाव पडला. महाराजांचे व आर्यसमाजाचे विचार पुष्कळसे सारखे असल्यामुळे त्यांनी आर्यसमाजाला प्रोत्साहन दिले. तथापि ब्राह्मण-ब्राह्मणेतर संघर्षात ब्राह्मणेतरांच्या बाजूने

लढायला एक आघाडीच उभी करावी असे त्यांच्या वारंवार मनात येऊ लागले व त्या दृष्टीने विचार करताना त्यांना महाराष्ट्रात नुकत्याच होऊन गेलेल्या स्वर्गीय महात्मा फुल्यांचे व त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे स्मरण झाले. मग महाराजांनी त्या सत्यशोधक समाजाचेच नव्याने पुनरुज्जीवन केले. त्यांच्या मताचे लोकही त्यांना भरपूर प्रमाणात मिळाले व ब्राह्मण-ब्राह्मणेतर संग्रामाला सुरुवात झाली.

पहिली सलामी घडली तीर्थक्षेत्रे व देवस्थाने यांच्या ठिकाणी चालणाऱ्या पुजाऱ्यांच्या झुंडशाहीविरुद्ध, पुंडपाळेगारीविरुद्ध. हे लोक सरसकट समाजाकडून वर्गणी म्हणून पैसा उकळीत, देवापुढचे द्रव्य त्यांच्याच मालकीचे असे; परंतु ज्या समाजाकडून ही दक्षिणा, हे द्रव्य, ही वर्गणी त्यांना मिळे, त्या समाजातल्या लोकांना मात्र साधे देवदर्शनही घ्यायला त्यांची आडकाठी असे. ‘ तू महार, तू इथून दर्शन घे. ’ ‘ तू चांभार, तू देवाला शिवू नको, दूर हो. ’ अशी भाषा चाले; पण त्याच वेळी एखादा साहेब-इंग्रज अधिकारी खुशाल देवाच्या मूर्तीपर्यंत बूट न काढता जायचा. शाहूमहाराजांनी पहिली तोफ डागली या पुजाऱ्यांच्या मुजोरीवर. शेकडो महार-मराठे एक होऊन देवळादेवळातून घुसू लागले मनोभावे देवदर्शन करू लागले. पुजाऱ्यांनी खूप ओरड केली; पण ऐकतो कोण?

महाराज तसे धार्मिक व श्रद्धाळू मनाचे. देव-देवतार्चन, तीर्थस्नान, पूजा-पाठ यांच्यावर त्यांचा विश्वास. त्यासाठी त्यांनी एका ब्राह्मण भटजींचीही व्यवस्था केलेली. महाराजांच्या स्नानाचे वेळी त्यांना मंत्र सांगणे, त्यांच्याकडून देवाची षोडशोपचार पूजा करून घेणे, हे त्यांचे काम. त्या कामाबद्दल त्यांना वर्षासनही दिलेले. पण हे भटजी अखेर ब्राह्मण होते. त्यांना आपल्या जातीचा आणि

ज्ञानाचा विलक्षण अभिमान होता. महाराजांना मंत्र सांगतानाही भटजीबुवा आपण ब्राह्मण, महाराज क्षत्रिय म्हणजे आपल्यापेक्षा कनिष्ठ असा भाव मनात वागवीत व त्यांना काय मंत्रातले कळते, अशा घमेंडीत कधी वैदिक मंत्र, कधी पौराणिक मंत्र, तर कधी नुसतीच पुटपुट असे करू लागले. पण एक दिवस हे ढोंग महाराजांच्या लक्षात आले. त्यांनी भटजीबुवांच्या ध्यानात त्यांची चूक आणून दिली; पण त्यामुळे भटजीबुवा खजील झाले नाहीत. उलट 'आपण क्षत्रिय नसल्यामुळे, आपणास वैदिक मंत्र म्हणायचा अधिकार नाही व म्हणूनच आपण पौराणिक मंत्र म्हटले पाहिजेत!' असे ते महाराजांना पटवून देऊ लागले. त्यामुळे महाराज संतप्त झाले. त्यांनी त्या दिवशी मंत्र न म्हणताच स्नान केले व ते अस्वस्थ मनःस्थितीत घरी परतले. मग त्यांनी स्वतःच्या क्षत्रियत्वाविषयी पुरावा आणून भटजीबुबांना निरुत्तर केले; पण आता वारे वेगळ्याच दिशेने वाहू लागले. काय वाटेल ते झाले, तरी महाराजांना क्षत्रिय म्हणायचे नाही व त्यांनी पुढे आणलेले सर्व पुरावे टाकावू ठरवायचे, असा चंग भटजीबुवांनी, त्यांच्या अन्य जातभाईंनी व शंकराचार्य वगैरे पीठाधीशांनी बांधला. ब्रह्मवृंदाचा व शंकराचार्यादिकांचा हा तेढा मार्ग लक्षात येऊनही महाराजांनी शेवटपर्यंत सामोपचाराचे प्रयत्न केले, स्वतःच्या निखळ क्षत्रियत्वाचे सर्व पुरावे सादर केले व भटजीबुवासह सर्व ब्रह्मवृंदांची वारंवार समजूत काढली; पण मंडळी ऐकेनात. उलट राजसत्ता विरुद्ध धर्मसत्ता असा लढा उभा करून महाराजांना बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू झाल्यावर महाराजांनी एका झटक्यात आपल्या भटजीबुवांचे वतन खालसा केले, त्या जागी दुसऱ्या तज्ज्ञ माणसाची नेमणूक केली व 'वैदिक मंत्र केवळ ब्राह्मण–मरा-

ठ्यांनीच काय, शूद्रांनीही म्हणावे,' या ईर्षेने समस्त ब्राह्मणवर्गा-विरुद्ध बंडाचा झेंडा उभारला!

इ. स. १९०२ साली ते सातव्या एडवर्डच्या राज्याभिषेकेसाठी इंग्लंडला गेले व तन्निमित्ताने बहुतेक युरोप खंडाचा प्रवास करून ते कोल्हापूरला परतले.

यानंतर महाराजांचे बहुतेक जीवनच ब्राह्मणेतर मंडळींच्या हितासाठी केलेल्या प्रयत्नात, ब्राह्मणशाहीविरुद्ध लढण्यात व व्यक्तिगत आयुष्यातील सुखदु:खे भोगण्यात गेले. पुण्यात व अन्यत्र शिवाजीमहाराजांचे पुतळे उभारून किंवा लोकोपयोगी शिक्षण-संस्था काढून त्यांनी शिवाजी महाराजांची स्मृती चिरंजीव करण्याचे प्रयत्न केले. त्याचप्रमाणे केवळ कोल्हापुरातच नवे महाराष्ट्रात जिथे कुठे शिक्षणसंस्था निघत असतील, तिथे जाऊन त्यांना सर्व प्रकारे साहाय्य देण्याचाही ते प्रयत्न करीत राहिले.

इ. स. १९१७ साली करवीर पीठाचे शंकराचार्य कैलासवासी झाले, तेव्हा त्यांच्या जागी समतास्वातंत्र्याचा पुरस्कर्ता आणि व्यासंगी विद्वान अशा डॉ. कुर्तकोटी यांची नियुक्ती करून महाराजांनी शंकराचार्यांच्या पीठाला खऱ्या अर्थाने लोकाभिमुख केले; परंतु थोडयाच दिवसात डॉ. कुर्तकोटी व महाराज यांचे मतभेद झाले. त्यामुळे कुर्तकोटी कोल्हापूर सोडून निघून गेले. मग महाराजांनी क्षात्र जगद्गुरूंचे नवे पीठ निर्माण केले व त्यावर सदाशिव पाटील नावाच्या एका पदवीधर, हुशार व व्यासंगी अशा मराठा तरुणाची नेमणुक करून सामाजिक क्रांतीचे एक नवे पर्व सुरू केले. स्वाभाविक कोल्हापूर संस्थानात तरी शंकराचार्य किंवा त्यांचे अनुयायी अन्य ब्राह्मणवर्ग यांना काही किंमत उरली नाही.

सतत लढा, झगडा, संघर्ष यामुळे आता दिवसेंदिवस महा-

राजांची प्रकृती खालावू लागली. ब्लडप्रेशर, मधुमेह यासारख्या व्याधी वारंवार त्रास देऊ लागल्या. अखेर ६ मे १९२२ या दिवशी महाराज मुंबई मुक्कामी मरण पावले.

शाहू महाराजांच्या मृत्यूने महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर आघाडीचा एक बुरुजच कोसळला. वस्तुत: ते समतावादी होते. सर्वांनी एकत्र राहावे, खेळीमेळीने वागावे, हेच त्यांचे स्वप्न होते. परंतु ते पुरे न होता त्यातून ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर असा भलताच व महाराजांना सर्वस्वी नको असणारा झगडा उभा राहिला. प्रारंभी नाखुषीने पण नंतर हिरिरीने त्यांनी या झगड्यात भाग घेतला. वृत्तीने ते साक्षात् राजर्षी होते. राजर्षी म्हणजे राजासारखे ऐश्वर्य दारी झुलत असूनही ऋषीसारखी साधी वागणूक ठेवणारा. महाराज साधे दिसत व साधेच वागत. डोक्याला एक कोल्हापुरी पागोटे, अंगात एक डगळ कोट, खाली तंग तुमान व पायात जोडे किंवा कोल्हापुरी वहाणा असा त्यांचा वेश असे. भरदार चेहऱ्यावर भरदार मिशा, ओठावर मिस्किल हसू, पण डोळे मात्र भेदक, असे शाहू छत्रपतींचे व्यक्तिमत्व होते. गेल्या शतकातील समाजसुधारकात त्यांचे स्थान निश्चितपणे मानाचे आहे.

## आठवणी

या आठवणीतून महाराजांचे वाहत्या झऱ्यासारखे निर्मळ अंतःकरण दिसून येते, तसेच त्यांचे चातुर्य, साहस, उदारता, गोरगरिबांविषयीची कळकळ, इ. सद्‌गुणही दिसून येतात. वाचा तर खरे काही आठवणी !

महाराज एकदा शिकारीला निघाले. बरोबर नोकरचाकरांचा लवाजमा होताच. भल्या पहाटे घराबाहेर पडलेली ही मंडळी सूर्य माथ्यावर आला तरी शिकारीच्या शोधात आपली जंगल तुडवीतच होती. आणि इतके करून शिकार तर सापडलीच नाही. बरोबरच्या नोकरांचा जीव भुकेने व्याकूळ झाला. बरे, ज्या कामासाठी बाहेर पडलो, ते पूर्ण झाल्याशिवाय जेवण घ्यायचे नाही, हा महाराजांचा दंडक. त्यामुळे नोकर मंडळींची मोठी कोंडी झाली. होता होता काही काही नोकर मुद्दामच मागे राहू लागले व करवंदीच्या जाळ्यातून शिरून अर्धी-कच्ची करवंदे खाऊ लागले. थोड्याच वेळात महाराजांच्या ते ध्यानात आले व ते थांबले. मागे मागे करणाऱ्या नोकरांना पुढे बोलावून म्हणाले,

'का रं लेकानूं, असं मागं मागं का ऱ्हाताय? दमला का यवढ्यात ?'

–त्याबरोबर ते नोकर चपापले. बोलताना घाबरून गेले. तेव्हा त्यांच्यातला एक जण जरा धाडसीपणाने पुढे येऊन म्हणाला,

'दमलो नाही महाराज, पण भूक लागली आता. भल्या सकाळीच घराबाहेर पडलो, त्यामुळे भाकरी पण घेता नाही आली.'

ते ऐकून महाराजांचे मन एकदम कळवळले. आपल्या शिका-

रीच्या नादात आपण या लोकांच्या भुकेकडेही लक्ष दिले नाही, याचे त्यांना वाईट वाटले व ते म्हणाले,

'अरे, अरे, असं झालं व्हय आमच्याकडून! बरं, ते व्हाऊं दे आता. तुमी समदी जनं आता आमचा डबा खावा. वाइच घोट घोट पाणी पिवा आन् एक एक डुकली काडा, तवर आमी काय शिकार मिळती का पाहातो.'

–असे म्हणून एक क्षणाचाही विलंब न लावता महाराज लांब लांब टांगा टाकीत समोरच्या झाडा-झुडपात शिरले.

\+ \+ \+

शाहू महाराज एवढे संस्थानिक! घरीदारी संपत्ती अगदी तुडुंब होती. वाटेल तेवढा पैसा ख्यालीखुशालीत अन् चैनीत उडवायला त्यांना कोणी नको म्हटले नसते. पण महाराजांनी असला अविचार कधी केला नाही. व्यसन तर त्यांना कसलेच नव्हते. साधे पानही ते कधी खात नसत, मग मद्यपानाची वगैरे गोष्टच दूर! तथापि एकदा ते आजारी पडले व त्यांना हुषारी वाटावी म्हणून त्यांच्या डॉक्टरांनी त्यांना औषधातून थोडी ब्रँडी दिली. पण महाराजांच्या ते तात्काळ लक्षात आले. औषधाचा पेला ओठाला न लावताच ते आपल्या भेदक डोळ्यांनी डॉक्टराकडे पाहात म्हणाले,

'तुमी ह्याच्यात दारू टाकली का?'

'होय, आपल्याला थोडी हुषारी यावी म्हणून—' डॉक्टर चाचरत घाबरत म्हणाले.

महाराजांनी तो पेला शांतपणे खाली ठेवला व तें करारी शब्दात म्हणाले,

‘हे बघा डॉक्टर, आमी दारू कधी घेत न्हाइ. नव्हं, तिच्या थेंबालाबी कधी शिवत न्हाइ. तवा तुमी आसल काही करू नका. आमाला हुषारी न्हाइ वाटली आन् आमी ह्याच्यात म्येलो तरी चालल, पण आसल काई आमच्याकडून होनार न्हाई! ’

महाराजांचे ते बोलणे ऐकून डॉक्टर अगदी चकित झाले व औषधासाठीही दारूच्या थेंबाला स्पर्श न करणाऱ्या आपल्या त्या गुणी धन्यापुढे त्यांनी आपला माथा नम्र केला.

\+ \+ \+

महाराज स्वत: दारू पीत नसत, हे खरे असले तरी आपले नियम दुसऱ्यावर सक्तीने कधी लादत नसत. या संदर्भात त्यांची एक आठवण मोठी गमतीदार आहे.

एकदा महाराज मोठ्या लवाजम्यानिशी असेच शिकारीला गेले होते. शिकार शोधता शोधता बारा वाजायला आले. तेव्हा महाराज एकाएकी थांबले व आपल्या घनगंभीर आवाजात म्हणाले,

‘चला रं, आता अगुदर जिवून घिऊ समदी जनं मग बघू शिकार.’

झाले. महाराजांनी अस म्हटल्याबरोबर सगळ्यांनी आपल्या शिदोऱ्या सोडल्या व भाकरी बाहेर काढल्या. पण दोघे नोकर

काही तसे करीनात. मग महाराजांनी चवकशी केली. तेव्हा ते थोड्याशा धाडसीपणाने म्हणाले,

'महाराज, आम्हीपण भाकरी सोडतो. पण आता एवढ्या दमणुकीनंतर थोडी हुषारी येण्यासाठी... ' असे म्हणून त्या दोघांनी एकाच वेळी दारू पिण्याची खूण केली.

–त्याबरोबर महाराज गडगडून हसले व म्हणाले,

'अरं मर्दानू, दारू पेयाला हवी व्हय तुमास्नी? बरं, घ्या आजच्यापुरती.'

असे म्हणून शिकारीच्या वेळी घोड्यांना पाजण्यासाठी आणलेली दारू महाराजांनी मागवून घेतली व ते सगळ्यांनाच म्हणाले,

'हं या. पिणारेच तेवढे या. मीच थोडी थोडी देतो समद्यांना. म्हाई तर पिऊन लोळायला लागाल!'

+ + +

अशीच आणखी एक गोष्ट. महाराज एकदा एका सरकारी कामासाठी कचेरीत गेले. पाहतात तो काय, तिथले एक दोन कारकूनच तेवढे कामे करीत आहेत आणि बाकीचे खुशाल पेंगताहेत, झोपा काढताहेत. एक रावसाहेब तर चक्क घोरत होते! महाराजांनी ते दृश्य पाहिले आणि त्यांना हसू आले. नंतर ते तडक राजवाड्यात आले आणि आपल्या सुताराला बोलावून त्याला म्हणाले,

'हे बघ हैदर, चांगली पाच–पन्नास बाकं बनव आपल्याला. एक माणूस झोपेल एवढी रुंदी ठेवायची बघ.'

सुताराला काय, आज्ञा झाली, त्याने काम चोख केले. मग ती बाके त्यांनी त्या कचेरीत घेऊन जायला सांगितले. पाठोपाठ महाराज तिथे गेले व नोकरांना म्हणाले,

'झोपारं लेकानू आता ह्येच्यावर! कामं नको करायला तुमाला! झोपा. झोपा.'

–असे म्हणून महाराज मोठ्यांदा हसले. पण त्यामुळे तिथले कारकून मात्र खजील झाले! त्यांनी आपली चूक कबूल करून महाराजांचे पाय धरले.

एका वेगळ्या पद्धतीने नोकरांच्या डोळ्यात अंजन घालण्याची महाराजांची ही पद्धत मोठी अभिनवच होती.

\+ \+ \+

पाच–पन्नास वर्षापूर्वी अस्पृश्य समाजाचे जीवन सगळीकडेच अत्यंत भीषण होते. कुणीही उठावे आणि एखाद्या महाराला धरावे व कामाला जुंपावे. जे महाराचे तेच चांभाराचे. पुन्हा कामाला भरपूर पैसे देतील म्हणावे, तर तेही होत नसे. महार, चांभार, भंगी, मांग या जाती म्हणजे सगळ्या गावाची कामे करणाऱ्या. त्यांना कामाला जुंपण्याची पद्धतच होती. या पद्धतीला वेठबिगार म्हणत. पन्नास–पाऊणशे वर्षापूर्वी ती इतरत्र रूढ होती, तशीच

कोल्हापूरातही. शाहू महाराजांनीच ती पद्धत बंद केली व अस्पृश्य समाजाला मोकळे केले. त्या आधी एक प्रसंग घडला, तो असा—

एकदा महाराज मुंबईला गेले. बरोबर कोल्हापूरच्या काही अस्पृश्य बांधवांना घेऊन गेले. मुंबईत फिरता फिरता तिथल्या बकाल वस्त्या, फुटपाथवरचे संसार, झोपडपट्टया वगैरे सगळा प्रदेश त्यांनी बारकाईने पाहिला व शेवटी आपल्याबरोबरच्या मंडळींना ते म्हणाले,

'तुमच्याही वर्गाची स्थिती अशीच का रे?'

'बरोबरची मंडळी काहीच बोलेनात. महाराज काय समजायचे ते समजले. मात्र कोल्हापूरात आल्याबरोबर त्यांनी तिथल्या सगळ्या अस्पृश्य पुरुषांना बोलावून घेतले. वकील, अन्य सल्लागार यांनाही बोलावणी पाठविली. मग प्रत्येकाला त्यांच्या अडचणी विचारायला सुरुवात केली. सगळ्यांच्या बोलण्यात वेठबिगारीपासून फार त्रास होतो असे झाले.

महाराजांना त्यांच्या वेदना जाणवल्या. त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. कंठ दाटून आला. पण मग त्यांनी त्या अस्पृश्य मंडळींना अभय देऊन म्हटले,

'ठीक आहे. आजपासून आपल्या राज्यातली वेठबिगार मी बंद करीन. हे इथे वकील आहेत, कायदेशीर सल्लागार आहेत, त्यांच्याकरवी हुकूम काढतो.'

—आणि खरोखरीच महाराजांनी वेठबंदीचा हुकूम त्या बसल्या बैठकीत काढला. इतकेच नव्हे, तर त्यानंतर किती तरी दिवस ते

स्वतः या प्रकरणी जातीने लक्ष घालीत. आपल्या हुकुमाची अंमलबजावणी कशी होते, ते डोळ्यात तेल घालून पहात.

\+ + +

महाराज साधे होते, तसेच कष्टाळूही होते. राजपदावर विराजमान होऊनही त्यांनी आपल्या शरीराला किंवा मनाला कोणत्याच चैनीची, ऐषारामाची सवय लावली नव्हती. त्यांचा देह अवाढव्य होता, तसाच काटक होता. कधी कधी त्यांना हत्तीची शुश्रूषा करण्याची हुक्की येई. एकदा हत्ती धुवायला लागले, की दुपारचे दोन दोन वाजले, ऊन तापून चटके देऊ लागले, तरी ते थांबत नसत. हत्तीच्या मर्जीमर्जीने घेत, त्याला चांगला चकचकीत, कुळकुळीत बनवीत. अशा वेळी एखाद्याने त्यांच्या डोक्यावर छत्री धरली, की ते रागावत. घोड्याला खरारा करायचा तोही असाच. ते म्हणत, ‘या जनावरांना आपण आपल्या स्वार्थासाठी वाटेल तसे ताबलतो, राबवतो; मग त्यांची सेवा नको करायला?’

\+ + +

महाराजांच्या सहनशक्तीचा आणि धैर्यशील वृत्तीचा एक प्रसंग सांगण्याजोगा आहे. एकदा त्यांच्या टॉन्सिलस वाढल्या. घशाला फार त्रास होऊ लागला. अखेर ऑपरेशन करायचे ठरले; पण ऑपरेशन करायचे म्हणजे क्लोरोफार्म द्यायला हवा व त्यासाठी इंग्रज रेसिडेंटची परवानगी काढायला हवी. कारण महाराज राजे असल्यामुळे त्यांच्या जीविताची जबाबदारी रेसिडेंटवर होती. आता काय करावे? रेसिडेंटची परवानगी आणायची तर महा-

म. ग्रं. सं. आणि वाचनालय शाखा
वा. क्र. [illegible] नो. दि. ........
वि. ........ क्र. ........


राजांना सांगितलेच पाहिजे आणि त्यांना तर तो अपमान वाटत असल्यामुळे ते या गोष्टीला विरोध करणार! असे सगळे एकात एक त्रांगडे झालेले. डॉक्टरमंडळी चिंतेत पडलेली पाहून महाराजांनी चिंतेचे कारण विचारले. डॉक्टरांनी वस्तुस्थिती सांगताच ते हसून म्हणाले,

'हात्तीच्या, एवढंच ना? तुम्ही क्लोरोफार्म न देताच ऑपरेशन करा. कितीही यातना झाल्या, तरी मी हूं की चूं करणार नाही!'

—आणि खरेच! मनस्वी वेदना होऊनही महाराजांनी आपला चेहरा जरासुद्धा वाकडा केला नाही! हालाहल पचविणाऱ्या भगवान शंकरासारखेच होते हे

+

IRBK-0112978

एकदा एका लग्नप्रसंगी महाराजाना आपल्या आवडाचे निरनिराळे कसरतीचे व लोकरंजक खेळ करविले. त्यात घोडेस्वाराशी हत्तीचा सामना असा एक खेळ होता.

नेहमी हा खेळ यथायोग्य पार पडत असे. पण त्या दिवशी हत्तीचे काही तरी बिनसले असावे. तो रंगणात आला तोच चिडून–संतापून. आल्याबरोबर त्याने वेगाने घोडेस्वारावर चाल केली. असावध घोडेस्वार एकदम बिचकला. पण हत्ती आता चवताळला होता. महाराजांनी ते पाहिले. आपल्या घटकेच्या करमणुकीसाठी एका निष्पाप अन् गरीब जीवाचा नाश होणार असे दिसताच त्यांनी एकदम झेप घेऊन हत्तीला मागे रेटले. मग माहूत व अन्य सरदार मंडळींनी हत्तीला शांत केले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम [illegible] वि. [illegible]
क्रमांक [illegible] नोंद दि. [illegible]